





# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा






रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०४.०३.२०२५ | अंक नं. ३०७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020






# प्रेमदान चौकातील सिग्नल बंद; वाहतूक कोंडीने नागरिक हैराण

**महामार्गावरील पथदिवेही बंद, वाहन चालकांना होतोयं प्रचंड त्रास**





नगर – नगर-मनमाड महामार्गावरील अतिशय वर्दळीच्या असलेल्या प्रेमदान चौकातील वाहतूक सिग्नल आणि पथदिवेही गेल्या काही दिवसांपासून बंद असल्याने सायंकाळनंतर अंधाराच्या साम्राज्यामुळे या चौकात वारंवार वाहतूक कोंडी होवून वाहनचालकांसह पादचारी नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. मध्यंतरी या चौकात अनेक अपघात झाले होतेफ हे अपघातांचे सत्र पुन्हा सुरु होण्याची आणि त्यात नागरिकांचे बळी जाण्याची वाट प्रशासन पाहतेय काय? असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे.

प्रोफेसर कॉलनीकडून येणारी-जाणारी वाहने या चौकातून वळतात. मनमाड रस्त्याने येणारी वाहने भरधाव जातात. त्यांच्या अनियंत्रित वेगामुळे अनेकदा अपघात होतात. या चौकात वाहतूक सिग्नल व्यवस्था बसवण्यात आलेले आहेत. मात्र, बऱ्याचदा सिग्नल बंद असतात. वाहतूक पोलिस या चौकात थांबत नसल्याने वाहतुकीचे नियोजन वाहनचालकच आपल्या पद्धतीने करतात. काही चालक सिग्नल तोडून तसेच पुढे जातात, त्यामुळे दुर्घटना घडतात.

नगर-मनमाड रस्त्याला समांतर असणाऱ्या बालिकाश्रम रस्त्याकडे जाण्यासाठी नागरिक या चौकाचाच वापर करतात. या चौकाजवळ अनेक हॉटेल्स व रुग्णालये झाली आहेत. त्यामुळे चौकात मोठी रहदारी असते. संबंधितांनी पार्किंगची पुरेशी व्यवस्था केली नसल्याने गाड्या महामार्गाच्या कडेलाच लावल्या जातात. रिक्षाचालकांचा गराडाही या चौकाला पडलेला असतो.

चौकातील सिग्नल सतत सुरु ठेवावेत. वाहतूक पोलिसही नेमावा म्हणजे सिग्नल तोडण्याचा प्रयत्न होणार नाही. बेशिस्त वाहनचालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांची नेमणूक व्हायला पाहिजे. मात्र शहर वाहतूक शाखा याकडे दुर्लक्ष करत असल्याचे पहावयास मिळत आहे. त्यामुळे या चौकात पुन्हा एकदा अपघातांची मालिका सुरु होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.


### तातडीने सिग्नल व पथदिवे सुरु करावेत : ॲड. सुधीर टोकेकर


प्रेमदान चौकामधील सिग्नल गेल्या पंधरा दिवसापासून बंद आहेत. हा चौक गजबजलेला असून, सदर सिग्नल कशामुळे बंद आहेत, हे समजत नाही. बंद असलेले सिग्नल आणि पथदिवे यामुळे चौकात अंधाराचे साम्राज्य असून, त्यामुळे या ठिकाणी वाहनांची प्रचंड गर्दी जमा होऊन चौक ओलांडून जाण्यासाठी खूप वेळ जात आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. याबाबत पंधरा दिवस झाले तरी याकडे कोणीही लक्ष देत नाही अथवा याबाबत कोणी काही बोललेले नाही, त्यामुळे सदर सिग्नल ताबडतोब सुरू करावे, अशी मागणी शहर भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने ॲड. सुधीर टोकेकर यांनी केली आहे.



















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## बाजारात करता जाहिरात – वाह क्या बात!

श्रद्धेशिवाय देव नाही अन् जाहिरातशिवाय उद्योग, व्यवसाय नाही. तुमचे उत्पादन असो वा सेवा सुविधा त्याची नेमकी गरज व प्रसिद्धी जोपर्यंत ग्राहकांपर्यंत बिंबवली जात नाही तोपर्यंत त्या वस्तू–सेवेची ब्रॅण्डींग, उपयुक्तता, आवश्यकता सर्वांगाने माहीत होत नाही.

जाहिरात कलेद्वारे परिणामकारक मार्केटिंग, विपणन करणे सहजशक्य असते म्हणूनच जाणकार उद्योजक, व्यावसायिक, व्यापारी, कॉर्पोरेट जाहिरातींवर लाखो, करोडो खर्च करतात. किंबहुना ही एक प्रकारची गुंतवणूक असते.

नुकतीच मिडीया इन्व्हेस्टमेंट ग्रुप एमने जारी केलेल्या अहवालात भारताच्या जाहिरात बाजारपेठेतील उलाढाल ७% वाढून सुमारे १.६५ लाख कोटींवर पोहोचेल असे सांगितले आहे.




देशातील जाहिरात बाजार जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावर असेल. ही वाढ एआयचा वापरप, ई कॉमर्स, हायपर–पर्सलायझेशन मार्केटिंगमुळे होत आहे. जाहिरातीवरील एकूण खर्चात (गुंतवणुकीत!) डिजीटल व टीव्हीचा एकत्रित वाटा ८६% पेक्षा अधिक आहे. तरीपण वृत्तपत्रीय जाहिरातींवर ग्राहकांचा सर्वात अधिक विश्वास वाटतो.

खरंतर जाहिरात कला अनोखी व वैशिष्ट्यपूर्ण आहे. तिचा नेटका उपयोग केला तर केवळ विक्री, विपणन वाढत नाही तर बॅण्डींग, प्रतिष्ठा मिळून ग्राहकांच्या मनातही स्थान लाभते. म्हणूनच आम्ही म्हणतो, 'युग हे जाहिरातीचे, जो जे करील तयाचे.'

– दिशान फिचर्स

# भरदिवसा बिनधास्तपणे युवकाने केली सक्कर चौकाजवळून मोटारसायकल चोरी

### घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद; गुन्हा दाखल, चोरट्याचे पोलिसांसमोर आव्हान




नगर – शहरातील अतिशय वर्दळीच्या असलेल्या स्टेशन रोडवर सक्कर चौक येथील कुंदन सुपर मार्केट दुकानासमोर रस्त्याच्या कडेला लावलेली हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल (क्र. एम एच १६ बी पी ३६८३) एका सराईत चोरट्याने अतिशय बिनधास्तपणे भरदिवसा चोरुन नेल्याची घटना ३ मार्च रोजी दुपारी घडली. चोरीची ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून या चोरट्याला पकडण्याचे मोठे आव्हान कोतवाली पोलिसांसमोर आहे.

या बाबत सुरज सोमनाथ केदारे (रा. मातोश्री अपार्टमेंट, संभाजी कॉलनी, रेल्वे स्टेशन अ.नगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी केदारे हे त्यांच्या आईसह सुपर मार्केट येथे किराणा घेण्यासाठी गेले होते. त्यांनी त्यांची मोटारसायकल दुकानाबाहेर रस्त्याच्या कडेला उभी केलेली होती. फिर्यादी व त्यांची आई हे दोघे दुकानात खरेदी करत असताना एक तरुण चोरटा दुकानात आला. त्याने माल खरेदीचे नाटक केले. काही वेळात फिर्यादी यांचा कानोसा घेत तो काहीही खरेदी न करता दुकानाच्या बाहेर गेला आणि त्याने मोटारसायकलला बनावट चावी लावून ती सुरु करून घेवून निघून गेला.

थोड्या वेळाने फिर्यादी दुकानाबाहेर आले असता मोटारसायकल चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी लगेच सुपर मार्केट येथील आतील व बाहेरील सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता फुटेज मध्ये एक अनोळखी तीस ते पस्तीस वयाचा चोरटा, त्याच्या अंगात काळसर हिरवट रंगाचा चेक्सचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट, पायात काळे बूट, डोक्यास पुढील बाजूस टक्कल पडलेले असा इसम मोटारसायकल चोरून नेताना दिसून आला. या प्रकरणी सुरज केदारे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. तसेच चोरीचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना दिले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार डाके हे करीत आहे.

# अबु आझमी यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ नगरमध्ये निदर्शने करत प्रतिमेला जोडे मारो

### औरंगजेबाच्या विचारांच्या लोकांना महाराष्ट्रात फिरून देणार नाही : संपत बारस्कर

नगर – औरंगजेब याने छत्रपती संभाजी महाराज यांची क्रूर पद्धतीने हत्या केली. त्या औरंगजेबाचा उल्लेख उत्तम प्रशासक म्हणून अबु आझमी यांनी केल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वतीने निदर्शन छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये करण्यात आले. औरंगजेबाच्या विचारांच्या लोकांना महाराष्ट्रात फिरून देणार नाही, महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारावरती चालतो, अशा बांडगुळ अबु आझमी याला आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली धडा शिकवल्याशिवाय गप्प बसणार नाही, असा इशारा शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी दिला.



छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अबु आझमी यांच्या बेताल वक्तव्याच्या निषेधार्थ त्यांच्या प्रतिमेला जोडो मारो आंदोलन करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अबु आझमी यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात आली. यावेळी संपत बारस्कर, गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, महिला जिल्हाध्यक्ष आशाताई निंबाळकर, कार्याध्यक्ष अभिजीत खोसे, सुरेश बनसोडे, मंगेश खताळ, युवराज शिंदे, सागर गुंजाळ, केतन क्षीरसागर, संतोष ढाकणे, वैभव ढाकणे, लताताई पवार, रेणुका पुंड, अंजली आव्हाड, सुरज शिंदे, सागर पंधाडे, सोनू घेमुंड, दिनेश जोशी, राजेश भालेराव आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

अबु आझमी यांच्या निषेधार्थ घोषणाबाजी करण्यात आली, तसेच त्यांच्या प्रतिमेला जोडो मारो आंदोलन करण्यात आले.

# कत्तलखान्यावर कारवाई करायला गेलेल्या पोलिसास धक्काबुक्की

### 'ये तुमको बहुत मेहंगा पडेगा' म्हणत दिली धमकी, एकावर गुन्हा दाखल

नगर – झेंडीगेट येथील व्यापारी मोहल्ला येथे बंद खोलीत सुरू असलेल्या कत्तलखान्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकून एकास ताब्यात घेतले. त्याच्याकडून २४ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाई दरम्यान कत्तलखाना चालविणाऱ्याने पोलिसास धक्काबुक्की करून तुम मेरे को पहचानते नही हो, ये तुमको बहुत मेहंगा पडेगा, अशी धमकी दिल्याचा प्रकार ४ मार्च रोजी सकाळी घडली.

कोतवाली पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी झेंडिगेट परिसरातील व्यापारी मोहल्ला येथील एका घरामध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्या कत्तलखान्यावर छापा टाकला. तेथे असलेल्या आवेश फारूक कुरेशी (वय ३२, रा. व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट) यास ताब्यात घेऊन त्यास घर कोणाचे आहे असे विचारले असता त्याने हे घर माझेच आहे व जनावरांचे मांस मी स्वतः विकतो असे सांगितले. पोलीस तेथे कारवाई करू लागताच आवेश याने तुम ये क्या कर रहे हो दादा, ये तुमको बहुत मेहंगा पडेगा, तुम मेरे को पहचानते नही हो अशी धमकी देऊन धक्काबुक्की केली. तसेच पोलीस कॉन्स्टेबल सचिन लोळगे यांना बाजूला ढकलून ते करत असलेल्या सरकारी कामात अडथळा केला.

पोलिसांनी आवेश यास ताब्यात घेऊन तेथून २४ हजार रुपये किमतीचे १२० किलो गोमांस, एक लोखंडी चाकू, एक लोखंडी सत्तूर, एक वजन काटा असा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी पो. कॉ. सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आवेश कुरेशी याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३२, २७१ सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सन १९७६ चे कलम ५ (क), ९ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील कारवाई सहाय्यक फौजदार बनकर हे करीत आहे. ही कारवाई कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या सूचनेवरून पोलीस अंमलदार सचिन लोळगे, तानाजी पवार, दीपक रोहोकले, संकेत धीवर, दत्तात्रय कोटकर, शिरीष तरटे, सुरज कदम, महिला पोलीस हवालदार रोहिणी दरंदले यांनी केली आहे.

## वडगाव गुप्ता शिवारातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची घटना एमआयडीसी परिसरातील वडगाव गुप्ता शिवारात २ मार्च रोजी घडली.

अल्पवयीन मुलगी घरात दिसून न आल्याने तिच्या घरच्यांनी तिचा वडगाव गुप्ता परिसरात, तिच्या मैत्रिणीकडे व नातेवाईकांकडे चौकशी करत शोध घेतला. मात्र ती कोठेही मिळून आली नाही. यावरून तिचे कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केले असल्याची त्यांची खात्री झाली. त्यानंतर तिच्या नातेवाईकांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

## गळफास घेऊन तरुणीची आत्महत्या

नगर – राहत्या घरात छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेऊन तरुणीने आत्महत्या केली. ही घटना एमआयडीसी परिसरातील दूध डेअरी चौक जवळील डोंगरे वस्ती येथे २ मार्चला दुपारी घडली. कावेरी दशरथ काळे (वय २०, रा. डोंगरे वस्ती, दूध डेअरी चौक, एमआयडीसी) असे मृत तरुणीचे नाव आहे.

कावेरी काळे यांनी घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यांचे नातेवाईक गणेश चव्हाण यांनी त्यांना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचाराकरीता नेले. रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना तपासून त्या उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. खराडे यांनी दिलेले अहवालावरून आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## बाळासाहेब घोडके यांचे अल्प आजाराने निधन

नगर – सावेडी गाव येथील रहिवासी बाळासाहेब तुकाराम




घोडके (वय ६७) यांचे २ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते सुनीता घोडके यांचे पती तर सागर व गणेश घोडके यांचे वडील होत.


## मारुतराव ताम्हाणे यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर – येथील वारकरी सांप्रदायातील मारुतराव शंकरराव



ताम्हाणे (वय ९३) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, पुतणे, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. न्यायालयीन कर्मचारी किरण ताम्हाणे यांचे वडील, अजितदादा पवार पॉलिटेक्निकल कॉलेजचे अकाउंटंट चेतन ताम्हाणे यांचे आजोबा होत.



**हनुमान चालिसा पाठ**

**बुधवार दि. ०५/०३/२०२५**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**जितु गंगाराम नारंग परिवार,** शिवाजी चौक, सिव्हील हडको, बी नं.–५५५, मो. ८७९६१००१०२.

# उसाच्या रसाच्या किंमतीवरून वाद, दोघांकडून एकास बेदम मारहाण

नगर – उसाच्या रसाची जास्त किंमत लावल्याची विचारणा केल्याच्या कारणावरून दोघांनी एकास शिवीगाळ दमदाटी करीत लाथाबुक्क्यानी व लाकडी दांडक्याने मारहाण केली. ही घटना केडगाव येथील जगदंबा मोटार्स शेजारी, रस्त्याच्या कडेला असलेल्या रसवंतीच्या दुकानात १ मार्च रोजी सायंकाळी घडली.

याबाबत ऋषिकेश सुनील गोरे (वय ३०, रा. शिवाजीनगर, दत्तचौक, केडगाव) याने कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ऋषिकेश गोरे हा त्याचा मित्र विशाल हरिदास रोहकले याच्यासह जगदंबा मोटार्स शेजारील रोडच्या कडेला असलेल्या रसवंतीच्या दुकानात रस पिण्यासाठी गेले असता रस पिऊन गोरे यांनी रसवंती चालक रवी आठरे यास ५० रुपये दिले असता त्याने आणखी १० रुपयाची मागणी केली. तेव्हा ऋषिकेश गोरे त्यास म्हणाला की सगळीकडे २० रुपयाला रस आहे, तुमच्याकडे ३० रुपयाला कसा काय आहे. त्यावेळी तो म्हणाला आमच्याकडे ३० रुपयाला आहे, असे बोलून त्यांनी शिवीगाळ केली.

तेव्हा त्यास शिवीगाळ का करतोस असे बोलले असता त्याला राग आला त्याने शिवीगाळ करीत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी रवी आठरे याचा मुलगा लालू आठरे हा तेथे आला. व त्यानेही शिवीगाळ करीत लाकडी दांडक्याने गोरे याच्या कपाळावर मारहाण केली. या मारहाणीत ऋषिकेश गोरे हा जखमी झाला. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी ऋषिकेश गोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रवी आठरे व लालू आठरे यांच्याविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

# मंत्रीपदाचा धनंजय मुंडेंनी दिला राजीनामा



बीड – बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर अखेर राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३ मार्चला सायंकाळी झालेल्या एका बैठकीत मुंडे यांना आपल्या पदाचा राजीनामा देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार ४ मार्चला सकाळी धनंजय मुंडे यांनी आपल्या पीए व ओएसडींच्या मार्फत आपला राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी तो तत्काळ स्वीकारला.

धनंजय मुंडे यांनी माझ्याकडे राजीनामा दिला असून मी तो स्वीकारला आहे. पुढील कार्यवाहीसाठी तो राज्यपालांकडे पाठविला आहे. त्यांना कार्यमुक्त केले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तर धनंजय मुंडे यांनी नैतिकतेवर राजीनामा दिला आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे.

याबाबत धनंजय मुंडे म्हणाले की, बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे स्व. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येतील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, ही माझी पहिल्या दिवसापासूनची ठाम मागणी आहे. काल समोर आलेले फोटो पाहून तर मन अत्यंत व्यथित झाले. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून आरोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे. तसेच, न्यायालयीन चौकशीही प्रस्तावित आहे. माझ्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून आणि मागील काही दिवसांपासून माझी प्रकृती ठीक नसल्याने पुढील काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. त्यामुळे वैद्यकीय कारणास्तव सुद्धा मी मंत्रिमंडळातून माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा मुख्यमंत्री यांच्याकडे दिला असल्याचे ते म्हणाले.

# पाण्याचा प्रश्न गंभीर, सर्वत्र घाण; आरोग्य आले धोक्यात; अनागोंदी कारभाराविरोधात संतप्त ग्रामस्थांनी ठोकले टाळे

नगर – नगर एमआयडीसी परिसरात असलेल्या नवनागापूर ग्रामपंचायतच्या सुरु असलेल्या अनागोंदी कारभारामुळे मोठी लोकसंख्या असलेल्या या ग्रामपंचायत हद्दीत राहणारे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. सर्वत्र घाणीचे साम्राज्य, निर्माण झालेला पाणी प्रश्न या समस्यांनी हैराण झालेल्या ग्रामस्थांनी आणि ग्रामपंचायत सदस्यांनी ग्रामपंचायतच्या या अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ कार्यालयास टाळे ठोकत आपला संताप व्यक्त केला आहे.



अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ नवनागापूर ग्रामपंचायत कार्यालयास टाळे ठोकत निदर्शने करताना संतप्त ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ.

नवनागापूर ग्रामपंचायत अहिल्यानगर जिल्ह्यामधील सर्वात मोठी व सधन ग्रामपंचायत म्हणून ओळखले जाते. पण याच ग्रामपंचायतीमध्ये मागील काही वर्षापासून मोठे ग्रहण लागलेले आहे. ग्रामपंचायतीमध्ये एमआयडीसी असल्यामुळे येथील आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणात होतात व त्याचाच गैरफायदा काही ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी घेऊन आता नवनागापूर ग्रामपंचायत व समस्त कार्यकारी मंडळ वादाच्या भोवऱ्यात अडकलेले आहे. अनेक प्रकारच्या प्रशासनिक चौकशीला सामोरे जात आहेत.

नवनागापूरचे ग्रामपंचायत तीन वर्षापासून नेहमीच विवादाच्या घेऱ्यात अडकलेली दिसते. पाणी प्रश्नावरून ही खूप मोठा ग्राम सभेत गदारोळ झाला होता. मागील एक महिन्यापासून कचरा उचलणे बंद असल्यापासून मुळे व ग्रामपंचायतीच्या ढिसाळ व्यवस्थापनाबद्दल ग्रामस्थांमध्ये अत्यंत नाराजीचा सूर दिसून येत आहे. गावचे सरपंच व ग्रामसेवकांनी ग्रामस्थांना कसलीही पूर्वसुचना न देता अचानक कचरा संकलन करणाऱ्या सर्व घंटागाडी बंद केल्या आहेत. त्यामुळे सुमारे २५ हजार लोकसंख्येच्या गावात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. जागोजागी कचऱ्याचे ढिगारे व त्यातून पसरणारा दुर्गंध, तसेच सदर कचरा गावातच पेटून दिल्यामुळे धुराचे साम्राज्य तयार झालेल आहे, प्लास्टिकच्या उग्र धुरामुळे नागरिकांना गुदमरल्यासारखं होत आहे.

यामुळे गावातील सर्वसामान्य लोक वयस्क व लहान मुलांच्या आरोग्याच्या अतिशय गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अनेकांना डायरिया सारखे गंभीर स्वरूपाचे साथीचे आजार होऊ लागले आहेत. पण ग्रामपंचायत प्रशासनाला कसल्याही प्रकारची काळजी घेतलेली नाही. सर्वांना वाऱ्यावर सोडून सरपंच व ग्रामसेवक गाड झोपेचे सोंग घेतलेल आहे. यामुळे ग्रामस्थांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आहे. यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाला जागे करण्यासाठी ३ मार्च रोजी सकाळी १० वाजता ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब सप्रे व गावातील प्रतिष्ठित व्यक्तींनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर जनआक्रोश आंदोलन करीत प्रशासनाचा निषेध व्यक्त केला व घोषणाबाजी करत घंटागाडी तात्काळ सुरू करण्याची मागणी केली.

पण सरपंच आंदोलकांना उत्तर न देता घरी निघून गेले. ग्रामसेवकांना दुसऱ्या गावाचा चार्ज असल्यामुळे तेही खूप उशिरा आंदोलन स्थळी आले. ग्रामअधिकारी व सरपंच यांचा आपसातील ताळमेळ कमतरता लक्षात आल्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी नवनागापूर ग्रामपंचायत कार्यालयास टाळे ठोकण्यात आले व जाहीर इशारा दिला की गावातील कचरा व्यवस्थापन पूर्ववत करून कचरा गाडी पूर्ववत सुरु करत नाहीत, तोपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय बंदच राहील. याबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर व गटविकास अधिकारी श्री. सोनकुसाळे यांनी या प्रकारणात लक्ष घालून सखोल चौकशी करून, समस्त ग्रामस्थांना न्याय मिळवून द्यावा. गटविकास अधिकारी आल्याशिवाय व लेखी दिल्याशिवाय ग्रामपंचायतीचे टाळे उघडले जाणार नाही, असा इशारा सर्व नागरिक व ग्रामपंचायत सदस्यांनी दिला आहे.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब सप्रे, संजय भोर, सागर सप्रे, सुशीला जगताप, कल्पना गीते, रंजना दांगट, संगीता भापकर, रेणुका पुंड, राधाबाई फापाळे, सुभाष दांगट, संजय गीते, महादेव सप्रे, राम घाडगे, सोमनाथ काळे, राजेंद्र शिंदे, संतोष आजबे, डॉ. संजीव गडगे, अशोक साळवे, हेमंत लगड, बाळासाहेब मोरे, विपुल भोसले, विशाल बरे, बाबासाहेब शेवाळे, राम अडसुरे, पवन मोरे, भास्कर घोरपडे, आकाश कोल्हाळ, संदीप गायकवाड, राजेंद्र नागुडे, नितीन खंडारे, हेमंत राऊत, गुलाब ठुबे, दादा गडगे, सुनिल मते, भास्कर घोरपडे, रामदास जाधव, दत्तात्रय लोखंडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### बहुगुणी बेलाचे पान

महादेवाला प्रिय असलेल्या बेलाच्या पानाने ताप, थंडी आणि अस्थमा यासारखे आजार झाल्यास पानांचा ताजा रस मधासोबत घेतात. डोळ्यांशी संबंधित समस्या असल्यास पानावर तूप लावा आणि डोळ्यांना शेक द्या. सांधेदुखी होत असल्यास बेलाची पाने गरम करुन वेदना असलेल्या ठिकाणी लावावी आराम मिळतो.

## पाककला

### पोहे ज्वारी कॉम्बो

**साहित्य :** १/२ कप पोहे, १/२ ज्वारी पीठ, ४/५ लसूण पाकळ्या, १/२ इंच आले, २/३ हिरव्या मिरच्या, १/२ कप दही, १/४ कप किसलेल गाजर, १/४ कप ढोबळी मिरची, १/४ कप टोमॅटो, १/४ कप कांदा, २ टेबलस्पून कोथिंबीर, १.५ टिस्पून मीठ, ४ टेबलस्पून तेल

**कृती :** प्रथम पोहे स्वच्छ धुवून घ्या नी त्यात दोन टेबलस्पून पाणी घालून १० मिनीट बाजूला ठेवा. २ पोहे भिजवून दहा मिनीटे झाल्यावर त्यात आल, लसुण, मिरच्या घाला आणि थोडे पाणी घालून मिक्सरमधून बारीक वाटून घ्या. आता मिश्रणात दही घाला नी नंतर थोडे थोडे ज्वारी पीठ नी पाणी घालून व्यवस्थित मिसळून घ्या गुठळ्या राहता नये. मिश्रण फेटून घ्या. वरील मिश्रणात आता गाजर, टोमॅटो, ढोबळी मिरची, कोथिंबीर, मीठ घाला नी व्यवस्थित मिसळून घ्या. थोडे पीठ जाडसरच ठेवा. गॅसवर तवा तापत ठेवा तेल घाला जास्त नको थोडे जाडसरच पीठ घाला नी धिरडे किंवा टोमॅटो ऑम्लेट सारखे करून घ्या. दोन्ही बाजूस शेका. चटणी किंवा सॉस बरोबर खायला द्या.

## वास्तू

### असे असावे स्नानगृह

स्नानगृहातील कपाटे व शेल्फ सामान्य असावीत. त्यांना नैसर्गिक रंग द्यावा. स्नानगृह हे घराइतकेच किंबहुना त्याहून जास्त प्रकाशमय असले पाहिजे. एखाद्या व्यक्तीच्या जीवनात खूप कष्ट असतील किंवा त्याच्या धनाचा व्यवस्थित उपयोग होत नसेल तर स्नानगृह मोठे केल्याने परिस्थितीत सुधारणा होईल.

## सल्ला

मटारच्या दाण्यांना थोडेसे मोहरीचे तेल लावून ठेवावे. यामुळे दाणे खराब न होता जास्त दिवस टिकतात.

## सौंदर्य

बीटामध्ये असणारी पोषक तत्त्वे हेल्दी आणि ग्लो आणण्यास मदत करतात. याशिवाय बीटाचे पाणी फेसपॅकसाठी वापरल्यास गालांवर नैसर्गिकपणे गुलाबी रंग येऊ शकतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. ५ मार्च २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, फाल्गुन शुक्लपक्ष, कृत्तीका २५।०८, सूर्योदय ०६ वा. ३४ मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : उधारी उसनवारी वसुल होईल. जुने मित्र भेटतील. शॉपिंगचा आनंद घ्याल.

**वृषभ** : मालमत्ताविषयक कामे होतील आणि उत्तमपैकी नफा होईल. हितशत्रू डोके वर काढतील.

**मिथुन** : आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकारात सहभागी व्हाल.

**कर्क** : तुमच्या हातातून पैसे हरवू शकतात. कुटुंबियांवर लक्ष केंद्रीत कराल. भाऊबंद डोके वर काढतील.

**सिंह** : आपली स्वप्ने प्रत्यक्षात येतील. भाऊबंद डोके वर काढतील.

**कन्या** : आर्थिक नफा होईल. महत्त्वाची खरेदी कराल.

**तूळ** : आज तुम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का बसेल.

**वृश्चिक** : बालपणीचे मित्र भेटतील. मागील उधारी वसुल होईल.

**धनु** : आशावादी रहाल आणि सकारात्मक बाजूकडे लक्ष द्याल. मानसिक त्रास संभवतो.

**मकर** : तुम्ही आधी घेतलेल्या कष्टांमुळे अनपेक्षीत लाभ मिळेल.

**कुंभ** : वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. पितृचिंता सतावेल. सामाजिक ठिकाणी प्रतिष्ठा वाढेल.

**मीन** : नोकरीतील स्थिती चांगली राहिल. पत्नीची मदत होईल. मुलांचा सहवास लाभेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### ‘मुर्ख’


शिक्षक : वर्गात जो मुर्ख असेल त्याने उभे राहावे.
शिक्षकांची सूचना ऐकून पप्पू उभा राहिला.
शिक्षक : तु मुर्ख आहेस का?
पप्पू : नाही सर, तुम्ही एकटेच उभे होते म्हणून मला योग्य वाटले नाही

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी


✻ कोणी आपल्या वेबसाईटवर राष्ट्रीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्री वर ३ एपिसोड ची सिरीज प्रसिद्ध केली? – फिफा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१२७ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१२६ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) इतर, गौण ३) पायऱ्या असलेली विहीर ५) चक्कर; फेरी ६) सायंकाळ; संध्याकाळ ९) चैतन्य; शुद्धी; अंत:करणाची जागृत स्थिती १०) बाण; तीर ११) धोतरजोडीतील एक भाग; पर्ण १२) पाणी पिण्याची शारीरिक स्थिती किंवा इच्छा; तृष्णा १४) लागून; जवळ १६) वांगे भाजून केलेले एक कालवण १७) कोलकात्याचे आंतरराष्ट्रीय विमानतळ (पूर्वीचे नाव) १८) गेलेला; भूत; अवस्था; दशा १९) वाटा; हिस्सा २०) बारीकसारीक; किरकोळ

**उभे शब्द :-** १) पृथ्वीच्या वातावरणाबाहेरील निर्वात पोकळी; अंतरीक्ष २) सिद्ध; सज्ज; धष्टपुष्ट ३) वडील; जनक; तात; पिता ४) जडपणा; पत; प्रतिष्ठा ५) क्रीडा; लीला ७) चलाख; हुशार; ताजातवाना ८) पगार; पेमेंट ९) घोटाळा; तंटयास कारण; प्रस्थ ११) दिल्लीचे आंतरराष्ट्रीय विमानतळ (पूर्वीचे नाव) १३) कर; हस्त १५) तीन गुणांपैकी एक; अंधार १६) उपासाला चालणारा एक तांदूळ १७) उतरण; ढाळ; कडपा; टेकडी १९) स्तुतिपाठक; चारण

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : संघर्ष केल्याशिवाय कोणीही महान होत नाही, जोपर्यंत घणीचा घाव घेत नाही दगड सुद्धा देव होत नाही.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मानवी शरीरात किती हिमोग्लोबीन असावे?

हिमोग्लोबिन हा एक महत्त्वाचा रक्त घटक किंवा एक शक्तिशाली प्रथिन आहे जो फुफ्फुसातून आपल्या शरीरातील विविध ऊती आणि अवयवांपर्यंत ऑक्सिजन पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. ते शरीरातील एका सुपरहिरोसारखे आहे, जे शरीराच्या प्रत्येक भागाला, ऊतींना किंवा अवयवाला जिथे त्याची सर्वात जास्त गरज असते तिथे ऑक्सिजन पोहोचवते याची खात्री करते. शरीरात हिमोग्लोबिन असणे पुरेसे नाही; ते योग्य असले पाहिजे. खूप जास्त नाही, खूप कमी नाही. याशिवाय, या महत्त्वाच्या रक्त घटकाबद्दल जाणून घेण्यासारखे बरेच काही आहे. लाल रक्तपेशींमध्ये असल्याने, हिमोग्लोबिन हे ग्लोबिन्स नावाच्या चार प्रथिन उपयुनिट्सपासून बनलेले एक शक्तिशाली प्रथिन आहे. प्रत्येक उपयुनिट हे लोह असलेल्या हेम गटाशी बांधलेले असते, जे हिमोग्लोबिनला फुफ्फुसातील ऑक्सिजनशी बांधण्यास आणि त्याची आवश्यकता असलेल्या ऊती आणि अवयवांना ते सोडण्यास सक्षम करते.

शरीराच्या विविध भागांमध्ये ऑक्सिजन वाहून नेण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याव्यतिरिक्त, ते रक्ताचे नियंत्रित करण्यास आणि कार्बन डायऑक्साइड काढून टाकण्यासाठी फुफ्फुसांमध्ये परत वाहून नेण्यास मदत करते. तरी प्रौढ पुरुषांत १४ ते १८ तर प्रौढ स्त्रियांत १२ ते १६ ग्रॅम/डेसिलीटर इतके हिमोग्लोबिनचे आदर्श प्रमाण आहे.

## अंधश्रद्धा

विजयनगरच्या राज्यात रामय्या नावाचा माणूस राहत होता. त्याला शहरातील लोक अशुभ मानत होते. जर तो सकाळी दिसला तर त्यांचा संपूर्ण दिवस वाईट जातो असा त्यांचा विश्वास होता. आणि ते दिवसभर उपाशी राहत असत त्यांना काहीही खायला मिळत नसे.

ही गोष्ट राजाच्या कानावरही गेली. सत्य जाणून घेण्यासाठी त्याने रामय्याला आपल्या महालात बोलावले. त्याने त्याच्या सेवकांना त्याच्या खोलीच्या शेजारी असलेल्या खोलीत रामय्याच्या मुक्कामासाठी सर्व सोय करण्याचे आदेश दिले. दुसऱ्या दिवशी सकाळी राजा कुणालाही न भेटता रामय्याचे तोंड पाहण्यासाठी त्याच्या खोलीत गेला.

दुपारी राजा जेवायला बसला, पण त्याच्या ताटावर माशी बसल्याने राजा काहीही खाऊ शकला नाही. त्याने स्वयंपाक्याला त्याच्यासाठी दुपारचे जेवण तयार करण्यास सांगितले. दुपारचे जेवण तयार झाले होते, पण कृष्णदेवरायांना आता जेवायची इच्छा नव्हती. राजाने काहीही खाल्ले नसल्याने त्याला कामात लक्ष घालता येत नव्हते. लोक जे काही बोलतात ते खरेच होते हे त्याच्या लक्षात आले. अशाप्रकारे त्याने रामय्यासारख्या माणसाने जगू नये असा निर्णय घेतला आणि आपल्या सैनिकांना त्याला फाशी देण्याचा आदेश दिला. सैनिकांना त्याला फासावर लटकवायचे नव्हते, परंतु ते त्यांच्या राजाची आज्ञा मोडू शकले नाहीत. आपल्या पतीच्या शिक्षेबद्दल कळल्यानंतर रामय्याची पत्नी तेनालीची मदत घेण्यासाठी धावली. खूप दुःख आणि डोळ्यातून अश्रू सांडत तिने तेनालीला सगळं सांगितलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी शिपाई रामय्याला फाशी देण्यासाठी घेऊन जात असताना वाटेत त्यांना तेनाली भेटला. तेनालीने रामय्याच्या कानात काहीतरी सांगितले आणि तो निघून गेला. जेव्हा रक्षकांनी रामय्याला फाशी देण्यापूर्वी त्याची शेवटची इच्छा विचारली तेव्हा त्याने सांगितले की त्याला राजाला एक चिठ्ठी पाठवायची आहे.

रक्षकाने ती चिठ्ठी राजाकडे दिली. राजाने ती चिठ्ठी वाचली. त्या चिठ्ठीमध्ये लिहिले होते की, माझा चेहरा पाहिल्यास दिवसभर भूक लागत नाही, तर जो माणूस राजाचा चेहरा पाहतो, त्याला सकाळी प्राण गमवावे लागते. मग अधिक शापित कोण– तो किंवा राजा? राजाला अर्थ समजला आणि त्याने रामय्याला मुक्त केले.

तात्पर्य : अंधश्रद्धेवर कधीही विश्वास ठेवू नका.

## रहमते दर्शन (भाग – १)



महाराज कृपालसिंह जी के परमधाम सिधारने के पश्चात उनकी रस्म क्रियाएँ चल रही थीं। सारी संगत शोक मग्न थी। मेरे अन्तर से यही पुकार निकल रही थी कि महाराज जी! हम कहाँ जायेंगे? मैंने वहीं पर विराजमान महाराज दर्शनसिंह जी की ओर देखा और पाया कि उनकी आँखों में इतना तेज था कि मैं सहन नहीं कर पाई और संगत के सामने बता दिया कि यही वक्त के गुरु हैं। घर के जिस कमरे में मैं भजन आदि करती थी, वहाँ मैंने एक दिन पाया कि संत दर्शनसिंह जी वहाँ पर मेरे आने से पहले ही विराजमान थे। मेरा ख़्याल और पक्का हो गया। जब मैं भजन पर बैठी तो मेरा शरीर सुन्न हो गया और आँखें खोलने पर देखा कि वहाँ महाराज जी मौजूद नहीं थे।

### मेरे अद्भुत सहायक

मेरी छोटी बेटी की शादी थी। खाने का प्रबंध तो घर के आस–पास ही था परन्तु बारात कुछ दूरी पर ठहरी थी। मैंने अपने ७ वर्षीय पोते को कहा कि वहाँ जाकर बैठो (इंतज़ाम की जगह) और देखभाल करते रहो । वो लड़का वहाँ बैठ गया तो उसने देखा कि महाराज जी भी वहाँ ठहल रहे थे। वह भी उठकर महाराज जी के साथ टहलने लगा। उसने अभी नाम नहीं लिया था परन्तु पता नहीं क्यों उसने ऐसा किया। बीच में ही वह दौड़ा–दौड़ा ऊपर आकर मुझे महाराज जी के आने के बारे में बताने लगा । मैंने नीचे जाकर देखा तो महाराज जी वहाँ नहीं थे। जब मैंने फोटो दिखाई तो उसने महाराज जी की फोटो पर अँगुली रख दी कि यही हैं जो अभी आये थे।

इस प्रकार दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज ने हर मुसीबत में और हर कार्य में मेरे अंग संग रह कर मेरी सहायता की।

------------------

### एक अमर यादगार

कहते हैं कि किसी प्रभु रूप हस्ती के बारे में हम कुछ नहीं जान कुछ जानकारी न सकते, जब तक कि वो हस्ती स्वयं अपने बारे में हमें दे।

महाराज संत दर्शनसिंह जी की जीवन शैली ने यह प्रमाणित कर दिया कि वे उन प्रभु रूप हस्तियों में से एक थे, जिन्होंने अपने व्यक्तित्व को हम दम्भी जीवों से छुपा के रखा। मेरी मुलाकात संत दर्शनसिंह जी महाराज से ६ फरवरी १९७४ को दिल्ली में मानव एकता सम्मेलन के अवसर पर हुई, जो कि परम संत कृपालसिंह जी महाराज के जन्मोत्सव के शुभ अवसर पर मनाया जा रहा था। उस समय मैं उन्हें भाई दर्शनसिंह के नाम से सम्बोधित करता था क्योंकि वे मेरे गुरु के सुपुत्र थे और वे सादे, नम्र और असाधारण व्यक्तित्व वाले थे। जब उन्होंने रक्स करती है फ़ज़ा वज्द में जाम आया है ग़ज़ल पढ़ी तो मैं भाव–विह्वल हो उठा। इस समारोह के तत्पश्चात मैंने गद्गद् होकर उनके चरण छूने चाहे, लेकिन वे संगत की भीड़ में न जाने कहाँ खो गये। बाद में उसी रात जहाँ हम ठहरे हुए थे, वहीं पर मुझे उनसे मिलने का सौभाग्य प्राप्त हुआ। वे वहाँ पर उस घानावासी के बारे में, जिसने संत कृपालसिंह जी

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

मुझे गर्व है कि हम इसके नीचे कार्य करते हैं। आप की यह बात वह व्यक्ति बास तक पहुचा देगा और उसका अटीच्युड आप के प्रति बदल जाएगा। बास कोई भी काम आप को करने को सौंपता है और वह काम आप की सीट का है या नहीं है आप ने यस कहना है। अगर आप को कोई समस्या है या यह काम किसी और का है तो थोड़ी देर बाद जा कर बास को इस काम के बारे बताएं। वह जिसका काम है उसी को सौंप देगा। अगर फिर भी वह हठ करता है तो वह कार्य कर दो चाहे आप की सीट का न भी हो।

कई बार बास आप से ऐसे कार्य करने के लिये जबानी आदेश देता है जो नियमों के विपरीत होते है तब भी आप ने हां करना है। तथा तुरंत एक नोट बनाओ कि आप ने अमुक काम करने को कहा है। परन्तु यह नियमो के विपरीत है, अगर फिर भी आप यह करवाना चाहते हैं तो इसे लिखित में मंजूर कर दें। वह अपने आप पीछे हट जाएगा। अगर वह लिखित में मंजूरी दे देता है तब वह कार्य कर दो। उसके लिये वह खुद जिम्मेवार होगा। अगर जबानी आदेश को लिखित में लेने का समय नहीं है तो

### दिमाग की शक्ती

पहले आप उसे कर दो और कार्य पूरा होने के बाद तुरंत लिखित में ले लो और उस में यह सब वर्णन करना है कि यह नियमो के विपरीत है। बास कोई भी गलत कार्य करने को कहता है तब एक बार उस को जरूर बताना है कि यह नियम अनुसार नहीं है। अगर आप नहीं बताएंगे तो वह आप को दोषी बना देगा कि आप ने मिस गाइड किया है। कई बार आप के ड्राफ्ट को बास बदल देता है और ऐसा आदेश कर देता है जो नियम के विरुद्ध है। तब आप उस ड्राफ्ट की कापी सम्भाल कर रखे उसे नष्ट न करें। समय पर आप उसे प्रस्तुत कर सकते हैं। दोषी बास ही बनेगा। अगर आप प्रूफ नहीं दिखा पाए तो दोष आप का हो जाएगा। आप अपनी सीट के काम पर केंद्रित रखें। दूसरे क्या कर रहे हैं उसके बारे कभी भी बास को शिकायत न करें। यह सीनियर्स का काम है। वह अपने आप देखेगें।

आफिस में हर बात पर उलझना ठीक नहीं

आफिस में कुछ बातें आप को बुरी लग सकती हैं। उन्हे लेकर बेवजह लड़े झगड़े नहीं। कुछ बातो को एक कान से सुन कर दूसरे से बाहर निकाल दें। अपना व्यवहार सीमित और मर्यादित रखें। सहकर्मियों पर व्यंग्य न कसे । भद्दे मजाक न करें। अपने बास व सहकर्मियों की बुराई न करें। हमेशा याद रखें कुछ कमिया आप में भी होती हैं। विवादो से दूर रहें और किसी के बारे कुछ भी कहने से पहले ये सोच लें कि आप की कही बात को बढ़ा चढ़ा कर भी बताया जा सकता है। कई बार विपरीत लिंग के लोग ऐसा वैसा कमेंट कर देते हैं। इन मामलो को बेवजह तूल न दें और शांति से बात करके तुरंत खत्म करें। कुछ लोग आगे बढ़ने के लिये बास से दूसरे सहकर्मियों की झूठी चुगली करते हैं। ऐसा करने वालो की कोई कद्र नहीं करता और फिर एक दिन अन्य कर्मचारी भी मिल कर उसके खिलाफ साजिश रचते हैं। बेवजह दूसरों की टांग खींचने वाला एक दिन खुद गिरता है। सिर्फ अपने काम से काम रखें, कौन क्या कर रहा है, इस से आप का कोई मतलब नहीं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भवतींसाठी आरोग्यवर्धक पाककृती

✻ **कोहळ्याची भाजी – साहित्य –** कोहळा, हरभरा डाळ, कोथिंबीर, हिरवी मिरची, धनेपावडर, जिरे, तेल, मीठ, शेंगदाणे, मोहरी, लसूण, कढीलिंब..

**कृती –** कोहळा धुऊन त्याची सालं काढून घ्यावीत. सालं काढल्यानंतर त्याच्या आतील बिया काढून घ्याव्यात व छोटे छोटे काप करावेत. पातेल्यामध्ये तेल टाकून कढीलिंब, जीरे, मोहरीची फोडणी द्यावी. मिक्सरमध्ये भाजलेले शेंगदाणे, तीन ते चार हिरव्या मिरच्या, मीठ, कोथिंबीर, लसूण, ४–५ पाकळ्या, पाणी घालून बारीक करावे. हा बारीक केलेला मसाला वरील फोडणीत घालावा व चांगले परतून घ्यावे. यामध्ये भिजवलेली हरभरा डाळ व कापलेला कोहळा टाकावा. थोडे पाणी टाकून उकळी येऊ द्यावी व झाकण ठेवावे. कोहळा शिजायला फार वेळ लागत नाही; त्यामुळे भाजी पटकन होते. ही भाजी गरम भाकरी किंवा पोळीसोबत खाण्यास अतिशय छान लागते. **उपयोग –** रुचकर, पित्ताचे शमन करणारी अशी भाजी आहे. या भाजीमुळे गर्भवतीचे व बाळाचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहते. गर्भावस्थेमध्ये कोहळ्याचा वापर केल्याने बाळाचे धातुपोषण चांगले होऊन त्याची प्रकृती उत्तम घडते व दुष्टशक्तींपासून बाळाचा बचाव होतो व भावी आयुष्यात कठीण प्रसंगात संकटांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य कोहळ्यामुळे येते.

**गाजर कोशिंबीर –** साहित्य – दोन किसून घेतलेले गाजर, एक पाव वाटी उकडून घेतलेली मूग डाळ, दोन बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, थोडी कोथिंबीर, नारळाचा चव दोन चमचे, चवीपुरते, मीठ व लिंबाचा रस, फोडणीसाठी तेल, मोहरी, एक बारीक चिरलेला कांदा, कढीलिंब इ. कृती – सर्व साहित्य एकत्र करून त्याला मोहरी, कढीलिंबाची फोडणी द्यावी. या कोशिंबीरीमुळे 'अ' जीवनसत्त्व भरपूर मिळते.

**काकडीची कोशिंबीर –** गाजराच्या कोशिंबीरी प्रमाणेच आपण काकडीची कोशिंबीर बनवू शकतो. गर्भावस्थेमध्ये ज्यांचा रक्तदाब वाढलेला आहे. त्यांच्यासाठी कमी मीठ टाकून काकडीच्या कोशिंबीरीचा उपयोग होतो.

**बीटाची कोशिंबीर –** साहित्य – दोन बीट बारीक किसून घ्यावेत, एक गाजर किसून घ्यावे, एक हिरवी मिरची, थोडी कोथिंबीर, चवीपुरते मीठ, दोन चमचे दही इ. कृती – सर्व मिश्रण एकत्र करून मीठ, दही टाकून कालवून घ्यावे. त्यामध्ये 'लोह' व 'अ' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# संविधानिक हक्क, अधिकारासाठी गप्प बसणे सोडा

## निवडलेली ही राजसत्ता नसून, निवडणूक आयोगाच्या शक्तीवर निवडून आलेली ही राजसत्ता : मानव अधिकार कार्यकर्त्या व ज्येष्ठ पत्रकार तिस्ता सेटलवाड

नगर – देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वसमावेशक विशाल आंदोलन उभे राहिले. मात्र स्वातंत्र्यानंतर सामूहिक राष्ट्रवाद तोडण्याचे काम धर्मांध शक्ती करत आहे. पैशाच्या बळावर चालणारी लोकशाही आणि संविधानिक मार्गाने चालणारी लोकशाही यामध्ये मोठा फरक आहे. नागरिकांनी निवडलेली ही राजसत्ता नसून, निवडणूक आयोगाच्या शक्तीवर निवडून आलेली ही राजसत्ता असल्याचा आरोप मानव अधिकार कार्यकर्त्या व ज्येष्ठ पत्रकार तिस्ता सेटलवाड यांनी केला. तर संविधानिक हक्क, अधिकारासाठी गप्प बसण्याचे सोडून, प्रश्न उपस्थित करण्याचे आवाहन त्यांनी केले.

शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त शहरातील प्रोफेसर चौक येथील रावसाहेब पटवर्धन स्मारक सभागृहात झालेल्या कॉम्रेड गोविंद पानसरे स्मृती व्याख्यान व स्मृती प्रबोधन पुरस्कार समारंभाप्रसंगी सेटलवाड बोलत होत्या. नांदेड व लखनऊ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ.

ॲड. सुभाष लांडे, भारतीय महिला फेडरेशनच्या अध्यक्षा कॉ. स्मिता पानसरे, कॉ. ॲड. बन्सी सातपुते, राष्ट्र सेवा दलाचे प्रा. सुभाष वारे, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, आर्किटेक्ट अर्शद शेख, कॉ. संतोष खोडदे, डॉ. बापू चंदनशिवे, कॉ. बाबा आरगडे, भगवान गायकवाड, आप्पासाहेब वाबळे, लक्ष्मण नवले, भारती न्यालपेल्ली, बबनराव सालके, आनंद शितोळे, अशोक सब्बन, संध्या मेढे, ॲड. सुभाष भोर, किसनराव लोटके आदींसह भाकप, आयटक, प्रगतशील लेखक संघ, पीस फाउंडेशन व डाव्या पुरोगामी विचारांच्या संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आजची राजकीय परिस्थिती व लोकशाहीचे भवितव्य या विषयावर मार्गदर्शन करताना सेटलवाड म्हणाल्या की, संविधानाची मुल्ये पायदळी तुडवून नागरिकांच्या विरोधात कायदे तयार केले जातात. राजसत्तेने मीडिया ताब्यात घेतली आहे. ही मीडिया जातीयवादाला खतपाणी घालत आहे. धार्मिक प्रश्न उपस्थित करून शेतकरी, साखर कामगार, महिलांवरील अत्याचार, बेरोजगारी, शिक्षण क्षेत्रासह विविध जिव्हाळांच्या प्रश्नांपासून दुर्लक्षीत केले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या राजसत्तेला अधिकार मागणारे नागरिक नको असून, भिक मागणारे नागरिक पाहिजे



शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त शहरातील प्रोफेसर चौक येथील रावसाहेब पटवर्धन स्मारक सभागृहात झालेल्या कॉम्रेड गोविंद पानसरे स्मृती व्याख्यान व स्मृती प्रबोधन पुरस्कार समारंभ नुकताच झाला.

आहे. समाजात धार्मिक द्वेषाचे विष पेरले जात आहे. संविधान विरोधी शक्तींना तोंड देण्यासाठी नागरिकांना आपल्या हक्कांच्या मागण्यांसाठी प्रश्न उपस्थित करावे लागणार आहे. होत असलेल्या अन्याय, अत्याचार विरोधात गप्प बसणे सोडण्याचे आवाहन सेटलवाड यांनी केले. तर जनतेला सामूहिक पद्धतीने आवाज उठवावा लागणार आहे. सर्वजण गप्प बसल्यास अन्याय विरोधात आंदोलन उभे राहणे थांबतील, अशी भीती देखील त्यांनी व्यक्त केली.

ज्येष्ठ कम्युनिस्ट नेत्या कॉम्रेड सुलाबाई आदमाने यांना कॉम्रेड गोविंद पानसरे स्मृती प्रबोधन पुरस्काराने उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच भाकप पक्षावर पुणे विद्यापिठाला शोधनिबंध सादर करुन जिल्ह्यातील कम्युनिस्टांच्या चळवळीचे विशेष टप्प्यांचा इतिहास मांडून पीएचडी मिळवणारे शिर्डी येथील सौ.प्रा. डॉ. शितल धरम आणि प्रा. डॉ. गणेश विधाटे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात बन्सी सातपुते यांनी कॉम्रेड पानसरे ही फक्त भाकपची मालमत्ता नसून, शोषित विरहित समाजव्यवस्था निर्माण व्हावी असे ज्यांना वाटते अशा सर्व बदल स्वीकारणाऱ्यांचे ते नेतृत्व आहे. शाहू, फुले, आंबेडकर आणि शिवाजी महाराज यांचा विचार पुढे घेऊन जाणे म्हणजे गोविंद पानसरे यांच्या कार्याला पुढे घेऊन जाण्यासारखे आहे.

सरकार विरोधात बोलले, तर देशद्रोही ठरविले जाते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी कुलगुरु सर्जेराव निमसे म्हणाले की, सत्ताधाऱ्यांवर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नसून, विरोधक हताश झाले आहे. स्थिर सरकार असले तरी गर्वनिष्ठ सरकार घटनेत बसत नाही. समाजकारण, राजकारणात जात, धर्म असू नये! धर्माचा सामाजिक जीवनाशी संबंध असता कामा नये, मात्र प्रयागराज ते आपल्या जिल्ह्यातील मढीपर्यंत धर्मांधतेने संविधानाची मूल्य पायदळी तुडविण्यात आली आहे. एकीकडे टोकाची बेकारी, मुलांचे लग्न होत नाही, यावर तोडगा काढण्याऐवजी त्यांचे माथी भडकवली जात आहे. शिक्षण क्षेत्रात देखील भ्रष्टाचार सुरू झाल्याने गुणवंतावर अन्याय होत आहे. भ्रष्टाचार टोकाला पोहोचल्याने सर्वसामान्यांची पिळवणुक होत आहे. देशाच्या विकासाचे आभासी चित्र निर्माण केले जात आहे. विकसित भारताचे स्वप्न पाहताना शंका उपस्थित होत आहे. लोकशाहीच्या भविष्यासाठी पत्रकारितेचा चौथा स्तंभ बळकट होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. अन्यथा देशात फॅसीझमचा शिरकाव झाल्याशिवाय राहणार नाही, असे त्यांनी सांगितले.

सुभाष लांडे म्हणाले की, चळवळी बरोबर प्रबोधन व्हावे, हे सातत्याने पानसरे यांचे विचार होते. त्याच विचाराने हा कार्यक्रम घेण्यात आला आहे. समाजात उजव्या शक्ती दुही निर्माण करत आहे. यासाठी प्रबोधनाची गरज आहे. झुंडशाही राबवून सत्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत आहे. राज्यात धर्माधर्मात तेढ पसरवून दूषित वातावरण निर्माण करण्याचे काम सुरू आहे. घटनेने निवडून आलेले आमदार देखील घटने विरोधात कृत्य करून समाजाचे वाटोळे करायला निघाले आहेत. धर्मांधशक्ती विरोधात एकत्र येण्याचे त्यांनी आवाहन केले.

सत्काराला उत्तर देताना सुलाबाई आदमाने यांनी पानसरे यांच्या कार्यकाळातील आठवणी सांगून, सरपंच असताना पाणी प्रश्न, एमएसईबीत डीपीसाठी केलेले आंदोलनाचा संघर्ष सांगितला. ईव्हीएम मशीनमध्ये घोटाळे असल्याचा प्रश्न उपस्थित करून, लोकशाही राज्यात शासन जनमताप्रमाणे वागत नसल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष खोडदे यांनी केले. आभार बापू चंदनशिवे यांनी मानले.

---

## आनंदऋषीजी ब्लड सेंटर, नगर येथे ५ ते २७ मार्च दरम्यान मोफत हिमोग्लोबीन व रक्तगट तपासणी व मार्गदर्शन शिबीर



नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३२ व्या पुण्यस्मृतीदिना निमित्त आनंदऋषीजी ब्लड सेंटर च्यावतीने ५ ते २७ मार्च दरम्यान मोफत हिमोग्लोबीन (एचबी) व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २८ मार्च रोजी आनंदधाम येथे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. याकालावधीत दररोज सकाळी ८ ते सायंकाळी ७ या वेळेत या मोफत तपासणीचा लाभ सर्वांना घेता येणार आहे, अशी माहिती जैन सोशल फेडरेशनच्या वतीने देण्यात आली.

आनंदऋषीजी हॉस्पिटलअंतर्गत कार्यरत असलेली आनंदऋषीजी ब्लड सेंटर अद्ययावत सोयीसुविधांनी युक्त आहे. हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आरोग्यसेवा अधिकाधिक रूग्णांपर्यंत पोहचविण्यासाठी नेहमीच प्रयत्न केले आहेत तसेच महात्मा ज्योतिबा फुले योजने अंतर्गत रुग्णांना मोफत उपचार व रक्त व रक्तघटक दिले जाते व आनंदऋषीजी हॉस्पिटल तर्फे थॅलेसिमिया सेंटर चालवले जाते त्यामुळे नेहमी रुग्णांना रक्ताची आवश्यकता असतेच त्यामुळे आचार्यश्रींच्या पुण्यस्मृतीनिमित्त ब्लड सेंटर येथे मोफत हिमोग्लोबीन व रक्तगट तपासणीची सेवा उपलब्ध करून दिली आहे. आनंदऋषिजी ब्लड सेंटर तर्फे माफक दरात रक्त व रक्तघटक उपलब्ध असून असंख्य गरजू रूग्णांना याचा लाभ होत असतो. येथील सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन जैन सोशल फेडरेशन तर्फे करण्यात आले आहे. माहितीसाठी संपर्क : ०२४१.२३२०४७२, सुनिल महानोर (PRO & SW) मो.९९७५३९२६५०, ९५२७७२०१०१, गणेश कांकरिया ९४२२२३७०४३, अशोक कोठारी ९४२२७९७८९०.

## आचार्य सम्राट आनंदऋषीजी महाराजांच्या पुण्यस्मृतीनिमित्त आयोजित रक्तदान महायज्ञात तीन दशकांत सुमारे ३१ हजार रक्त पिशव्यांचे संकलन

नगर – भारतीय संस्कृतीत सत्पात्री दानाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. आधुनिक काळातही समाजातील गरजूंना दानशूर व्यक्तीमुळे मदत होते. याच संस्कृतीत रक्तदान ही काळाची मोठी गरज आहे. राष्ट्रसंत आचार्य सम्राट आनंदऋषीजी महाराज यांनी मानवसेवा हीच खरी ईश्वर सेवा अशी शिकवण देताना कायम समाजाला दानशूर वृत्ती अंगिकारण्याची शिकवण दिली. त्यानुसार सन १९९४ पासून आचार्यश्रींच्या पुण्यस्मृतीनिमित्त दरवर्षी २८ मार्च रोजी मानव सेवा केंद्र, धार्मिक परीक्षा बोर्ड अहमदनगर मर्चंटस बँकेच्या सहयोगाने रक्तदानाचा महायज्ञ चालवतात आहे. तब्बल तीन दशकांच्या या रक्तदान चळवळीत आतापर्यंत ३० हजार ९२६ रक्त पिशव्यांचे संकलन झाले. विशेष म्हणजे ७ हजार ३१ महिला भगिनींनी रक्तदान केले. २३ हजार ८९५ पुरूष रक्तदाते शिबिरात सहभागी झाले. विशेष म्हणजे नगरच नव्हे तर आचार्यश्रींवर श्रद्धा असलेले राज्यभरातील भाविक या कार्यात सहभागी होऊन रक्तदान करतात.



विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात खूप संशोधन झाले असले तरी अजूनही कृत्रिम रक्तं तयार करता आलेले नाही. अशावेळी अत्यवस्थ रूग्ण, थॅलेसिमिया ग्रस्त रूग्णांना एखाद्या निरोगी व्यक्तीने केलेले रक्तदानच जीवनदान देऊ शकते.

मानवसेवेच्या या महान कार्यासाठी आचार्यश्रींच्या प्रेरणेने आणि आशीर्वादाने नगरमध्ये रक्तदानाची चळवळ रूजली आहे. श्रद्धेय आचार्यश्रींच्या स्मरणार्थ भाविक अक्षरशः रांगा लावून रक्तदानाचे पवित्र कार्य करतात. या महायज्ञात महिला सुद्धा तितक्याच उत्साहाने सहभागी होऊन रक्तदान करतात.

सर्वसाधारणपणे महिलांमध्ये रक्तात हिमोग्लोबीनची पातळी तुलनेने कमी असते. अशा वेळी इच्छा असुनही अनेक महिलांना रक्तदान करता येत नाही. यासाठी श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्राच्या वतीने दरवर्षी जानेवारीतच मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिर घेऊन आवश्यक औषधोपचार केले जातात. त्यामुळे महिलांच्या रक्तदानाचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे.

दरवर्षी या शिबिरात आनंदऋषीजी ब्लड बँक (नगर व पुणे), जनकल्याण ब्लड बँक, जिल्हा रूग्णालय, महानगर ब्लड बँकेच्या टीम नियोजनपूर्वक रक्त संकलनाचे काम करतात. नगरमधील ही रक्तदानाची चळवळ संपूर्ण राज्यात नावाजली जाते. यावर्षी सुद्धा २८ मार्च रोजी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले असून जास्तीत जास्त रक्तदात्यांनी यात सहभागी होण्याचे आवाहन मानवसेवा केंद्र, धार्मिक परीक्षा बोर्ड, मर्चंटस बँकेने केले आहे.

---

# ३७ वर्षानंतर वाळकीमधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा रंगला स्नेहमेळावा

### शालेय जीवनातील आठवणींना दिला उजाळा

नगर – वाळकी (ता. नगर) येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयातील सन १९८८ च्या इयत्ता दहावी (एसएससी) च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शहरात उत्साहात पार पडला. ३७ वर्षानंतर एकत्र आलेल्या मित्र–मैत्रिणींनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

स्नेहमेळाव्यानिमित्ताने एकत्र आलेल्या वर्ग मित्र–मैत्रिणींनी शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, क्रीडा स्पर्धा, वर्गात मिळालेली शिक्षा, स्नेहसंमेलनातील अनेक गोड आठवणी सांगितल्या. माजी विद्यार्थ्यांनी जुन्या मित्रांबरोबर एकच धमाल करुन, आयुष्य घडविणाऱ्या माजी शिक्षकांसमोर नतमस्तक झाले. राज्याच्या विविध भागातून माजी विद्यार्थी–विद्यार्थिनी कार्यक्रमासाठी हजर होत्या.

वाळकी मधील रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयातील सन १९८८ च्या इयत्ता दहावी मधील माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन एका व्हॉट्सअप ग्रुप तयार केला आहे. या ग्रुपच्या माध्यमातून सर्व जुने सवंगडी एकमेकांच्या संपर्कात असतात. व्हॉट्सअपच्या माध्यमातून एकत्र आलेले माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याच्या कार्यक्रमातून एकवटले होते.

कार्यक्रमास उपस्थित तत्कालीन शिक्षकांनी सर्व माजी



न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयातील सन १९८८ च्या इयत्ता दहावी (एसएससी) च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा पार पडला.

विद्यार्थी–विद्यार्थिनींना नोकरी व्यवसाय करत असताना कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवावेत, मुलांवर चांगले संस्कार करावेत, समाज हिताची कामे करावी, शरीर प्रकृती चांगली राहण्यासाठी नियमित व्यायाम करण्याचे मौलिक मार्गदर्शन केले. माजी शिक्षिका जाधव मॅडमने यावेळी आपल्या विद्यार्थ्यांसाठी कविता सादर केल्या. तसेच माजी शिक्षकांनी आपल्या माजी विद्यार्थ्यांशी गप्पा मारताना जणू वर्गच भरविला होता. आपल्या लाडक्या शिक्षकांशी देखील विद्यार्थ्यांनी मनमुराद गप्पा मारुन जुन्या आठवणी सांगितल्या. उपस्थित मित्रांनी आपल्या भावना व्यक्त करुन जुन्या चांगल्या–वाईट आठवणीचा इतिहास मांडताना सर्वच भारावले.

स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग, दत्तात्रय लाड, रवींद्र नाईक, राम मुनफन, योहान पंचमुख, अरुण कुंजीर, बाळासाहेब भालसिंग, संगीता जपे, राजू माने, संगिता मते, रामदास इंगळे, महेश आसुदाणी, सुधीर कुलकर्णी, राजेंद्र खेडकर, रामभाऊ इंगळे, अनिल कजबे, राजू मुरूमकर, उज्वला राऊत–साळुंके, विद्या कोतकर–झिने, छाया भालसिंग–बागल, तानाबाई सातपुते–खामकर, नगमा शेख–पठाण, सुनीता कातोरे–पवार, निता गायकवाड, भारती भालसिंग, विद्या कोतकर यांनी स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते.

याप्रसंगी तत्कालीन शिक्षक प्रभाकर मुळे, रामभाऊ काटकर, अशोक बागल, सर्जेराव जगदाळे, अलका जगदाळे, उमाकांत महांडुळे, मीरा महांडुळे, उत्तम काळे, बाबुराव फळके, ज्ञानदेव बोठे, दिगंबर बोरुडे, साहेबराव अनभुले, छबुराव विलायते, पद्मा जाधव, मंगला लोखंडे, विजय टेमक, संपतराव जगदाळे आदी उपस्थित होते. सर्व माजी शिक्षक व माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा सोहळा रंगला होता.

---



JEE गणित विषयात अभूतपूर्व यश मिळविणारे गवांदे क्लासेसचे विद्यार्थी व शिक्षक.

## गवांदे क्लासेसच्या विद्यार्थ्यांचा जेईई गणित विषयात अभूतपूर्व यश

नगर – नुकत्याच जाहीर झालेल्या JEE (Main) २०२५ परीक्षेच्या पहिल्याच Attempt मध्ये गवांदे क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी गणित (Maths) विषयात घवघवीत यश संपादन करून निकालाचा उच्चांक प्रस्थापित केला आहे.

सदर परिक्षेत अभिजीत सोळुंके ९७.८९, सुशांत महांडुळे ९६.३८, अभिनंदन मुळे ९२.८९, सुमित वाणी ९१.५१, साहिल सय्यद ९१.७६ या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळविले आहे. तसेच ओम होळकर, ओंकार शेळके, निशांत काळे, ज्ञानेश्वर टकले, ओम ढगे, साहिल काळे, कु.वैष्णवी साबळे, हर्षल होळकर, आदेश तागड, सुजल सासवडे, चैतन्य मुळे या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले आहे. क्लासेसचे जवळपास २३ विद्यार्थी पहिल्याच प्रयत्नात JEE (Advance) म्हणजेच IIT च्या प्रवेश परीक्षेसाठी पात्र ठरतील.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संचालक प्रा. प्रभाकर गवांदे, सौ. छायाताई गवांदे, व्यवस्थापक युवराज महांडुळे आणि व्यवस्थापिका मोनाली पवार, किशोर गिते आदींनी अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

सध्या ११वी विज्ञानमध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १२वी MHT -CETJEE तसेच १२ वी बोर्डाची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी क्रॅश कोर्स या बॅचेसची प्रवेश प्रक्रिया चालू आहे.

## विज्ञानातील संशोधन सामाजिक विकासाला चालना देणारे

### प्रा. रावसाहेब सातपुते यांचे प्रतिपादन; ग्रामीण विकास मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

नगर – विज्ञानाचे महत्त्व समाजाच्या शाश्वत विकासासाठी अनन्यसाधारण आहे. विज्ञानातील संशोधन सामाजिक विकासाला चालना देणारे ठरतात. जागतिक विज्ञान दिवसाच्या उपक्रमांद्वारे विज्ञानाच्या उपयोगितेबद्दल जागरूकता निर्माण केली जाते. समाजातील शाश्वत आणि शांततापूर्ण वातावरणासाठी विज्ञानाचा वापर आवश्यक आहे. हा दिवस राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विज्ञानातील एकता निर्माण करण्यासाठी मदत करतो. विविध देश एकत्र येऊन विज्ञानाच्या साहाय्याने जागतिक समस्यांचे समाधान करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करत असल्याचे प्राचार्या रावसाहेब सातपुते यांनी सांगितले. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी वैज्ञानिक दृष्टीकोन जोपसला जावा यासाठी, त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



ग्रामीण विकास मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यामध्ये सहभागी झालेले शिक्षक व विद्यार्थी.

नागापूर येथील ग्रामीण विकास मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक उपकरण या थीमवर विज्ञान प्रदर्शन पार पडले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध प्रकल्पाच्या माध्यमातून आपल्या कल्पना शक्तीची चुणूक दाखवली. तर सादर केलेल्या विविध प्रकल्प पाहून पालक वर्ग अवाक झाले.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची जिज्ञासा वाढून त्यांच्यातील कला कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मुलांनी स्मार्ट वॉच, हेअर ड्रायर, हेलिकॉप्टर, कॅलक्युलेटर, मायक्रोवेव्ह ओव्हन, एटीएम मशीन, रोबोट, एलईडी बल्ब, लॅपटॉप, मोबाईल, रेफ्रिजरेटर, सीसीटीव्ही कॅमेरा, ब्ल्यू टूथ डीव्हाईस यांसारख्या उपकरणांचे प्रकल्प सादर केले होते. बालसंशोधकांनी उपकरणांची कार्यप्रणाली, उपयोग आणि त्यांचे महत्त्व विशद केले.

काजल महांडुळे यांनी डॉ. सी.व्ही. रमण यांच्या रमण इफेक्ट विषयी माहिती देऊन, भविष्यात आपल्या विद्यार्थ्यांपैकी शास्त्रज्ञ निर्माण व्हावे, अशी आशा व्यक्त केली. वैभव काळे पाटील यांनी विकासासाठी जागतिक विज्ञान दिनाचे उद्दिष्ट म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाला विज्ञान क्षेत्रातील घडामोडींची माहिती देणे आणि समाजाला विज्ञानाच्या फायद्यांची जाणीव करून देणे. विज्ञान हे केवळ तंत्रज्ञानाचा वापर करण्यापुरते मर्यादित नसून ते एक विचार करण्याची पद्धत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी विद्यालयाच्या पूनम गुंजाळ, कल्पना आव्हाड, दिपज्योती करांडे, आरती मदने, सुदाम गव्हाणे, वनिता कारखले, प्रशांत सोनवणे, रवी गावडे, निर्मला नेहूल आदींसह विद्यार्थी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना मेने यांनी केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# ख्रिस्ती समाजाला जाणीवपूर्वक टार्गेट केले जात आहे

**प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहू : हर्षवर्धन सपकाळ; शिष्टमंडळाने घेतली काँग्रेस प्रदेशाध्यक्ष यांची भेट, चंद्रकांत उजागरे यांनी मांडले शहरातील समाजाचे प्रश्न**



ख्रिस्ती समाज महाराष्ट्राचे उपाध्यक्ष सतीश (दादा) मेहेंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली ख्रिस्ती समाजाच्या राज्यातील शिष्टमंडळाने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची भेट घेतली.

नगर – ख्रिस्ती समाज हा शांतता प्रिय आहे. ख्रिश्चन मिशनरी सेवा संस्थांच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्य, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान देत असून, या समाजाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याची भावना काँग्रेसचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले.

बुलढाणा येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व समस्त ख्रिस्ती समाज महाराष्ट्राचे उपाध्यक्ष सतीश (दादा) मेहेंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली समस्त ख्रिस्ती समाजाच्या राज्यातील शिष्टमंडळाने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची भेट घेतली. यावेळी ते बोलत होते. प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हर्षवर्धन सपकाळ यांचा समस्त ख्रिस्ती समाज महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी यांच्या वतीने अहमदनगर ह्युम मेमोरियल चर्चचे विश्वस्त चंद्रकांत उजागरे यांनी त्यांचा सत्कार केला.

गेल्या काही दिवसापासून अल्पसंख्यांक समाजातील काही घटकांना विशेषतः ख्रिस्ती समाजाला आणि धर्माला जाणीवपूर्वक लक्ष केले जात आहे. समाज माध्यमातून होणाऱ्या चिथावणीखोर भाषणामुळे आणि लेखनामुळे समाज चिंताग्रस्त आहे. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील दिवसेंदिवस होत असलेले पीछेहाट समाजाचा आर्थिक स्तर उंचावण्याच्या दृष्टीने गेल्या अनेक वर्षापासूनची प्रलंबित स्वतंत्र महामंडळाची मागणी, काँग्रेस कमिटीमध्ये ख्रिस्ती समाजाला प्रतिनिधित्व द्यावं अशा अनेक महत्त्वाच्या प्रश्नासंदर्भात समस्त ख्रिस्ती समाजाचे राज्याचे अध्यक्ष दिलीप नाईक यांनी सविस्तर चर्चा घडवून आणली. अ‍ॅड. प्रकाश संसारे, चंद्रकांत उजागरे, अनिल भोसले, प्रवक्ते प्रशांत केदारी, सोन्याबापू वाघमारे आदींनी ख्रिस्ती समाजाची सद्यपरिस्थिती व ज्वलंत प्रश्न मार्गी लावण्या संदर्भात बैठकीत आग्रही मागणी केली. सपकाळ यांनी अतिशय काळजीपूर्वक समाजाच्या भावना समजून घेऊन काँग्रेस पक्ष सदैव ख्रिस्ती समाजाच्या पाठीशी उभा राहील असे आश्वासन दिले.

या बैठकीमध्ये आर.सी. गावीत, जयंत पाडवी, दीपक चंद्रशेखर, अनिल आगलावे आदींसह समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.



महावीर इंटरनॅशनलच्या महिला विभागाच्या वतीने स्नेहालय संस्थेस आरो जलशुद्धीकरण मशीन भेट देण्यात आले.

# महावीर इंटरनॅशनल महिला विभागातर्फे 'स्नेहालया'स जलशुद्धीकरण मशीन भेट

नगर – महावीर इंटरनॅशनलच्या महिला विभागातर्फे स्नेहालय संस्थेस आरो जलशुद्धीकरण मशीन भेट देण्यात आले. या प्रसंगी अहिल्यानगरचे शाखेचे अध्यक्ष अरुण पारख, सेक्रेटरी राजेंद्र बोथरा, माजी अध्यक्ष दिलीप कर्नावट, महिला विभागाच्या अध्यक्षा वैशाली शेटिया, सेक्रेटरी वर्षा बाफना, उल्का पारख, अर्पणा बोथरा, निर्मला बाफना, इंद्रकला चोपडा, सुरेखा पारख, सुनीता कर्णावट, उज्वला बोथरा नूतन संचेती, रूपाली बाफना आदींसह स्नेहालयचे विश्वस्त गुर्जर, श्रीमती असावा, सौ.मुनोत उपस्थित होते.

यावेळी महिला विभागाच्या अध्यक्षा वैशाली शेटिया म्हणाल्या, अहिल्यानगरमध्ये महावीर इंटरनॅशनल सामाजिक जाणीवेतून जिथे गरज आहे तेथे मदत करत आहे. यात महिला विभागाच्या वतीनेही वर्षभर विविध उपक्रम राबवले जात आहेत. स्नेहालय या संस्थेचे कार्य खूप महान आहे. अशा चांगल्या संस्थेला कायम सर्वप्रकारचे सहकार्य करू.

प्रास्ताविकात महावीर इंटरनेशनलचे मनोज शेटिया यांनी महावीर इंटरनॅशनल संस्थेच्या सामाजिक कार्याची सविस्तर माहिती दिली. स्नेहालायाचे गुर्जर यांनी महावीर इंटरनॅशनल केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.



इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट असोसिएशनद्वारे आयोजित आंतरविभागीय अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत शरद तरटे याने बाजी मारत प्रथम क्रमांक मिळवला.

# अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत आडसूळ पॉलीटेक्निकचा शरद तरटे प्रथम

नगर – इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट असोसिएशनद्वारे आयोजित आंतरविभागीय अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत शरद तरटे याने बाजी मारत प्रथम क्रमांक मिळवला. अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत ८०० रनिंग प्रकारात शरद ने हे यश मिळवले.

तसेच लाँग जंप व ट्रिपल जंप या प्रकारात उपविजेतेपद पटकावले, व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाला. या स्पर्धेचे आयोजन त्रिमूर्ती डी. फार्मसी कॉलेज, नेवासा फाटा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते.

या स्पर्धेसाठी पॉलीटेक्निकल इंजिनिअरिंगच्या सर्व विभागप्रमुखांचे विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी प्रोत्साहन लाभले. आडसुळ पॉलिटेक्निकचे प्राचार्य गडाख आर. एस. यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळामध्ये हार–जीत होतच राहते. खेळाडूंनी विजयाच्या आनंदा सोबत, हार सुद्धा स्वीकारून पुढील लक्षावर ध्येय केंद्रित करावे, असे सांगून त्यांनी खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवला.

तसेच या स्पर्धेतील विजयी खेळाडूवर, संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध आडसूळ, सचिव सौ. लिनाताई आडसूळ, डायरेक्टर कृष्णा आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ यांनी अभिनंदन केले.

या स्पर्धेसाठी आडसुळ पॉलिटेक्निकमधील सहप्रशिक्षक पठाण पी. जे. व प्रशिक्षक निंबाळकर एस. ए. यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभले.

# वृध्दाश्रमासाठी 'सेवाप्रीत'ने बांधून दिला १५ हजार लिटरचा हौद

**प्रयागराज येथील गंगाजल हौदेत टाकून आजी–आजोबांनी केली आंघोळ**



शहरातील सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या महिलांनी रांजणगाव, फत्तेपूर (ता. नेवासा) येथील शरणपूर वृध्दाश्रमासाठी १५ हजार लीटर क्षमतेचा हौद बांधून दिला.

नगर – शहरातील सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या महिलांनी रांजणगाव, फत्तेपूर (ता. नेवासा) येथील शरणपूर वृध्दाश्रमासाठी १५ हजार लीटर क्षमतेचा हौद बांधून दिला. त्याचा लोकार्पण नुकताच पार पडला. प्रयागराज येथील कुंभ मेळयातून आणलेले गंगाजल या हौदेत टाकून वृध्दाश्रमातील सर्व आजी–आजोबांना आंघोळीसाठी ते पाणी देण्यात आले होते. तर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृध्दाश्रमाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी सेवाप्रीतच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, कोषाध्यक्ष अर्चना खंडेलवाल, प्रकल्प प्रमुख तथा संचालिका गीतांजली माळवदे, सोनीया कुंद्रा, वंदना गोसावी, दीपा रोहिडा, रोहिणी दयानंद पाटील, दिपाली देवदूतकर, अंजली विजय गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते व शरणपूर वृद्धाश्रमाचे नवनिर्वाचित अध्यक्ष बाळासाहेब मुटकुळे, संस्थेच्या सचिव सुरेखा मगर, स्मिता देशमुख, सुनिता लेकुरवाळे, नूतन भोसले, नीशा पाटील, भारती यादव, पूजा गोंडाळ, मनीषा कंक, वर्षा शेकटकर, तृप्ती कोठारी, माधुरी येळाई, सोनी पाठक, वैशाली उत्तेकर आदींसह ग्रुपच्या महिला सदस्या, वृध्दाश्रमातील आजी–आजोबा आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, वृध्दाश्रमातील सर्व ज्येष्ठ आजी–आजोबा हे निराधार नसून, सेवाप्रीतच्या सर्व महिला सदस्या त्यांच्या नाती आहेत. त्यांच्या सुख–दु:खात कायम बरोबर राहून त्यांच्याशी कुटुंबाप्रमाणे ऋणानुबंध जोडले जाणार आहे. तुम्ही शरीराने कमजोर असू शकता, पण मनाने कधीही कमजोर होऊ नका. जीवनात आनंदी आणि उत्साही राहण्याचे त्यांनी सांगितले. हा फक्त जलप्रकल्प नसून, माणुसकीशी नाते जोडणारा सोहळा आहे. ज्येष्ठ नागरिक कुटुंबातील संपत्ती असून, त्यांच्या मार्गदर्शनाने सुखी जीवनाची यशस्वी वाटचाल होणार असल्याचेही ओबेरॉय म्हणाल्या.

गीतांजली माळवदे म्हणाल्या की, शरणपूर वृध्दाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना उन्हाळ्यात पाण्याचा प्रश्न बिकट बनल्यानंतर मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत होते. या हौद मध्ये १५ हजार लीटर क्षमतेचे पाणी साचवून ठेवण्यात येणार असल्याने, ज्येष्ठ नागरिकांची सोय होणार आहे. या कार्याने ज्येष्ठांचे जीवन सुखी करण्यासाठी व त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचे समाधान मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

बाळासाहेब मुटकुळे यांनी सेवाप्रीतच्या कार्यातून इतरांना देखील प्रेरणा मिळून वृध्दाश्रमातील ज्येष्ठांचे जीवन सुखी करण्यासाठी हातभार लागणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली.

सेवाप्रीतच्या महिलांनी जवळपास पन्नास हजार रुपये खर्च करुन वृध्दाश्रमासाठी हौद बांधून दिला आहे. या कार्यक्रमात सर्व महिलांनी ज्येष्ठ आजी–आजोबांना मिष्टान्न भोजनाचे वाटप केले. तर त्यांच्या मनमोकळे गप्पा मारुन त्यांचा आनंद द्विगुणीत केला.



आयएमएस संस्थेच्यावतीने आयोजित आग्रेयम स्पर्धेला जिल्ह्यातून प्रतिसाद मिळाला.

# स्पर्धेत भाग घेतल्यामुळे जीवनात निश्चित फायदा होता : डॉ. एम.बी. मेहता

**आयएमएस संस्थेच्यावतीने आयोजित आग्रेयम स्पर्धेला जिल्ह्यातून प्रतिसाद**

नगर – कोणत्याही स्पर्धेत भाग घेतल्यामुळे जीवनात निश्चित फायदा होतो, असे प्रतिपादन आयएमएस संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांनी केले.

बीपीएचई सोसायटीच्या आयएमएस या संस्थेने जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. मेहता यांच्या हस्ते झाले.

यावेळी उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, विभाग प्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे, जिल्हाभरातून आलेले शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी १५ महाविद्यालयातील ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. फेस पेंटिंग, पोस्टर मेकिंग, रील मेकिंग, गायन, जाहिरात तयार करणे, प्रश्न मंजुषा, अंताक्षरी, समूह नृत्य अशा आठ विभागात स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेतील विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. अहमदनगर महाविद्यालयाने एकूणच स्पर्धेतील विजेता म्हणून बाजी मारली त्यांना रोख बक्षीस रु. दहा हजार, सन्मानचिन्ह देण्यात आले. अडसूळ टेक्नीकल चास, न्यू आर्टस् कॉलेज पारनेर, न्यू आर्टस् कॉलेज, नगर, विश्वभारती कॉलेज नगर यांनी देखील विविध विभागात यश संपादन केले.

डॉ. मेहता यांनी संस्थेची माहिती देताना या ठिकाणी विद्यार्थांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी घेत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस व विभागप्रमुख डॉ. तेलोरे यांनी देखील विद्यार्थांना मार्गदर्शन केले. आयएमएस एमबीएच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थांनी शिक्षकांच्या मदतीने सर्व स्पर्धेचे नियोजन केले. यातून त्यांना व्यवस्थापनाचे धडे मिळाले. इतर महाविद्यालयातील विद्यार्थांनी मनोगत व्यक्त करताना आग्रेयम स्पर्धेच्या माध्यमातून एक चांगले व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल मनापसून कौतुक केले.

आग्रेयम ही जिल्हाभरातील एक नावलौकिक असणारी स्पर्धा आहे. त्यामुळे दिवसेंदिवस याला मिळणारा प्रतिसाद पाहता जास्तीत जास्त महाविद्यलयांनी यात सहभाग घ्यावा, असे आवाहन देखील यावेळी करण्यात आले. प्रत्येक महाविद्यालयासाठी नाममात्र ५०० रु नोंदणी शुल्क घेऊन विद्यार्थाच्या नाश्ता, जेवण व चहाची व्यवस्था आयएमएस संस्थेच्यावतीने करण्यात आली होती. या स्पर्धेच्या यशस्वीततेसाठी डॉ. हर्षवर्धन भावसार, डॉ. राहुल खंडेलवाल, डॉ. मनोज कुलकर्णी यांनी प्रयत्न केले.


# महिला दिनानिमित्ताने सोनाली नवांगुळ यांना 'स्नेहालय'कडून 'अग्निशिखा' पुरस्कार जाहीर



नगर – जागतिक महिला दिनानिमित्त या वर्षीपासून स्नेहालय, अहिल्यानगर यांच्याकडून कर्तृत्ववान महिलांसाठीचा अग्निशिखा पुरस्कार देण्यात येत आहे. यासाठी त्रीसदस्यीय समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. भारतातील कोणत्याही क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या महिलेची निवड या पुरस्कारकरिता करण्यात येणार आहे. पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष असून मानपत्र, रुपये एकवीस हजार रोख आणि मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यावर्षीचा प्रथम पुरस्कार कोल्हापूर येथील साहित्यिका सोनाली नवांगुळ यांना जाहीर झाला आहे.

८ मार्च रोजी दुपारी २.३० ते ४.०० या वेळेत लेखिका मेधा भास्करन यांच्या हस्ते मुथा सभागृह, स्नेहालय, एमआयडीसी येथे पुरस्काराचे वितरण होईल. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन स्नेहालय परिवार करीत आहे.

# Ak Crew तर्फे ९ मार्च रोजी अहिल्यानगरमध्ये प्रदर्शन




नगर – Ak Crew तर्फे ९ मार्चला महात्मा फुले चौकातील इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय येथे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

यामध्ये कपडे, ज्वेलरी, खाण्याचे पदार्थ, संसारोपयोगी वस्तू आदी अनेक स्टॉल्स् लावण्यात आले आहेत.

या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ७५८८३६००८६.



सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे ज्ञानविज्ञान पुरस्कार डॉ.सुधा कांकरिया यांना प्रदान करण्यात आला. (छाया–हेमंत ढाकेफळकर)

# ज्येष्ठांचे अनुभव हे विश्वाचे विद्यापीठ

**डॉ.सुधा कांकरिया यांचे प्रतिपादन; सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे 'ज्ञानविज्ञान' पुरस्कार**

नगर – ज्ञान म्हणजे आपण निरळनिराळ्या क्षेत्रात प्रगती करतो. म्हणजे हे ज्ञान लौकिक व व्यवहारीक ज्ञान होय. परंतु अध्यात्मिक ज्ञान म्हणजे सत्य ईश्वरी ज्ञान होय. विज्ञानाने आज प्रगती केली. या विज्ञानाला दोन बाजु आहेत, तर ज्ञानाला एकच बाजु आहे. म्हणुनच जसा जसा माणूस वृद्ध होत जातो, तसा तसा तो अनुभवाने समृद्ध होत असतो. जेष्ठांचे अनुभव हे विश्वाचे विद्यापीठ आहे. म्हणून त्यांच्या हातुन मला ज्ञानविज्ञान पुरस्कार दिला गेला हे माझे भाग्यच आहे, असे प्रतिपादन डॉ.सुधा कांकरिया यांनी केले.

सावेडी जेष्ठ नागरिक मंचातर्फे यंदाच्या वर्षी ज्ञानविज्ञान पुरस्कार डॉ.सुधा कांकरिया यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी डॉ.प्रकाश कांकरिया, अदिनाथ जोशी, मोरेश्वर मुळे, बाजीराव जाधव, शरद कुलकर्णी, बलभिम पांडव, शोभा ढेपे, ज्योती केसकर, पुष्पा चिंताबर, स्नेहन वेलणकर, लिलाताई गोविलकर, सुप्रिया सोनटक्के आदी उपस्थित होते.

डॉ.सुधा कांकरिया पुढे म्हणाल्या की, स्त्री भ्रुणहत्या हे महापाप आहे. स्त्री भ्रुणहत्या म्हणजे केलेला आत्मघातकी हल्ला आहे. आई आहे म्हणून जगात माणूसकी आहे, प्रेम आहे. ती दोन्ही कुळाचा उद्धार करते.

यावेळी अध्यक्ष आदिनाथ जोशी म्हणाले की, समाजात उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींना दरवर्षी सावेडी जेष्ठ नागरिक मंचाच्यावतीने 'ज्ञानविज्ञान' पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षीचा पुरस्कार डॉ.सुधाताई कांकरिया यांना देण्यात आला.

पुरस्कार मानपत्राचे वाचन बाजीराव जाधव यांनी केले. तर परिचय ज्योतीताई केसकर यांनी केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बलभिम पांडव यांनी केले. तर आभार मोरेश्वर मुळे यांनी मानले.

# निवासी चौकीदार पदासाठी ५ मार्चपर्यंत अर्ज करावा

नगर – महासैनिक लॉन संकुल, अहिल्यानगर येथे कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात निवासी चौकीदार पद भरण्यात येणार आहे. इच्छुकांनी ५ मार्च पर्यंत अर्ज करावेत. माजी सैनिकांना यामध्ये प्राधान्य दिले जाणार आहे. ४५ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या माजी सैनिकांनी अर्जासोबत सैन्य सेवेतील डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र, आधारकार्डची छायांकित प्रत आदी कागदपत्रांसह अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

# केडगावमध्ये आजपासून अखंड हरिनाम सप्ताह



नगर – केडगाव येथील रेणुका माता मंदिरा समोर रेणुका माता अखंड हरिनाम सप्ताह आणि तुकाराम गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. जगदंबा तरुण मंडळ, शिवमुद्रा ग्रुप केडगाव देवी यांच्या वतीने ४ ते ११ मार्च या कालावधीत सप्ताह होणार आहे.

पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ८ ते १२ ग्रंथराज तुकाराम गाथा पारायण, दुपारी २ ते ५ रामायण कथा, सायंकाळी हरिपाठ, रात्री ८ ते १० यावेळेत हरीकिर्तन होणार आहेत. कथाप्रवक्ते रामायणाचार्य ह.भ.प. भाऊसाहेब पन्हाळकर (शेवगाव कांबी) हे रामायण कथा सांगतील. श्रीनिवास महाराज घुगे, ह.भ.प. शामसुंदर ढवळे ह.भ.प., भाऊसाहेब पन्हाळकर, ह.भ.प. एकनाथ चत्तर, ह.भ.प. सोमनाथ पाटील, ह.भ.प. उद्धव चोले, ह.भ.प. चैतन्य राऊत आदींची कीर्तनसेवा होणार आहे.

११ फेब्रुवारी रोजी भागवताचार्य ह.भ.प. अंकुर साखरे बीड यांचे काल्याचे कीर्तन होईल. ह.भ.प. रामदास क्षीरसागर, ह.भ.प. बन्सी मोकाटे, ह.भ.प. मारूती चन्ने हे व्यासपीठ चालक आहेत. याचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



अहिल्यानगर जिल्हा शरीर सौष्ठव संघटना संलग्न महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य ऑलिंपिक असोसिएशन यांच्या मान्यतेने अहिल्यानगर येथे झालेल्या ५० व्या'अहिल्यानगर श्री २०२५' स्पर्धेमध्ये हॉटेल पॅपिलॉन ज्यूस बार अँड पावभाजी येथील सहकारी सेवक ओंकार चव्हाण यांनी बॉडी बिल्डिंग स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल त्यांचा सत्कार अमोल पोखरणा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संजय झिंजे, अजय झिंजे, अनिकेत झिंजे, शुभम झिंजे, नितीन ताठे उपस्थित होते.



देवगड संस्थानचे महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांनी 'स्नेहबंध'चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा सन्मान केला.

# युवा मानस

फंडू एसएमएस

चाहत वो नहीं जो जान देती है,
चाहत वो नहीं जो मुस्कान देती है,
ऐ दोस्त चाहत तो वो है, जो पानी
में गिरा आँसू पहचान लेती है।

अब तो वो चाकू लेके मेरे
पिछे पडा है, उसे कहा था दिल
चीर के देख ,
तेरा ही नाम होगा

होके मायूस ना यूं शाम से
ढलते रहिये।
जिंदगी भोर है सूरज सा
निकलते रहिये।

## बँकींग क्षेत्रात रोजगाराची संधी




संधी मोलाची

'बँक ऑफ बडोदा'ने अप्रेंटिसशिप पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली आहे. या भरतीसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया या १९ फेब्रुवारीपासून सुरू झाली आहे. इच्छुक आणि पात्र असणारे उमेदवार बँकेच्या अधिकृत वेबसाइटवर अर्ज करू शकतात. या बँकेत एकूण चार हजार प्रशिक्षणार्थी पदे भरण्यात येणार आहेत.

**शैक्षणिक पात्रता**

अर्ज करण्यासाठी उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून कोणत्याही प्रवाहात पदवी उत्तीर्ण केलेली असावी.

**वय मर्यादा**

उमेदवाराचे वय २० वर्षांपेक्षा कमी आणि २८ वर्षांपेक्षा जास्त नसावे. तथापि, राखीव प्रवर्गातील उमेदवारांना नियमानुसार वयात सवलत दिली जाईल.

**अर्ज करण्यासाठी किती फी?**

या भरतीमध्ये सामान्य, ओबीसी आणि ईडबल्यूएस श्रेणीतील उमेदवारांना अर्ज फी म्हणून ८०० रुपये भरावे लागतील तर एससी, एसटी आणि महिला उमेदवारांसाठी हे शुल्क ६०० रुपये असेल. पीडबल्यूबीडी श्रेणीतील उमेदवारांना ४०० रुपये शुल्क जमा करावे लागेल. यासोबतच अर्ज शुल्कासह जीएसटी स्वतंत्रपणे भरावा लागेल.

युनियन बँक ऑफ इंडियामध्येही २६९१ अप्रेंटिसशिप पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. १९ फेब्रुवारी २०२५ अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. बँकिंग क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या आणि बॅचलर पदवीधारक तरुणांसाठी ही संधी चांगली आहे. इच्छुक उमेदवार युनियन बँकेच्या अधिकृत वेबसाइटवर ऑनलाइन अर्ज करू शकतात. अर्ज करण्याची शेवटची तारीख ५ मार्च २०२५ आहे.


**महाराष्ट्रात २९६ पदांसाठी भरती होणार**

देशभरात २६९१ पदांवर भरती केली जाईल. त्यात विविध राज्ये आणि प्रदेशांसाठी रिक्त पदे निश्चित करण्यात आली आहेत. आंध्' प्रदेशात ५४९, अरुणाचल प्रदेशात १, आसाममध्ये १२, बिहारमध्ये २०, चंदीगडमध्ये १३, छत्तीसगडमध्ये १३, गोव्यात १९, गुजरातमध्ये १२५, हरियाणामध्ये ३३, हिमाचल प्रदेशात २, जम्मू-काश्मीरमध्ये ४, झारखंडमध्ये १७, कर्नाटकमध्ये २८, महाराष्ट्रात २९६, दिश्रत ६९, ओडिशामध्ये ५३, पंजाबमध्ये ४८, राजस्थानमध्ये ४१, तामिळनाडूमध्ये १२२, तेलंगणामध्ये ३०४, उत्तराखंडमध्ये ९, उत्तर प्रदेशमध्ये ३६१ आणि पश्चिम बंगालमध्ये ७८ पदांवर भरती करण्यात येणार आहे.

टिप्स अँड ट्रिक्स

### कार इन्शुरन्स प्रीमियम वाचवायचाय?

तुम्हाला कार इन्शुरन्सशी संबंधी माहिती असायला हवी. कारण कोणती माहिती तुम्हाला कधी उपयोगी पडेल हे सांगता येत नाही. जुनी कार विकल्यानंतर नवीन कार घेणार असाल, तर खरेदी करताना विम्याच्या प्रीमियमवर पैसे कसे वाचवू शकता याची जाणीव ठेवली पाहिजे.



नवीन कार खरेदी करताना विम्याच्या प्रीमियमवर पैसे वाचवण्यासाठी तुम्ही 'एनसीबी ट्रान्सफर'चा लाभ घेऊ शकता.

माहीत असावे...

### 'एनसीबी ट्रान्सफर'म्हणजे काय?

कोणत्याही विमा पॉलिसीमध्ये 'एनसीबी' लिहिलेले दिसल्यास, याचा अर्थ क्लेम बोनस नाही. हा बोनस तुम्हाला देण्यात आला आहे कारण तुम्ही पॉलिसीची रक्कम भरली आहे, त्या वर्षी तुम्ही विमा कंपनीकडून कोणताही दावा घेतला नाही. क्लेम न घेतल्यास कंपनीने तुम्हाला 'नो क्लेम बोनस'चा लाभ दिला आहे जो पुढील वेळी प्रीमियम कमी करण्यात मदत करेल.




## आयफोनच्या चाहत्यांना झटका



टेक वर्ल्ड

आयफोन म्हणजे प्रतिष्ठेचे लक्षण झाले आहे; परंतु आयफोनच्या चाहत्यांना मोठा झटका बसला आहे. कारण आयफोन १६ ई लॉंच झाल्यानंतर कंपनीने तीन लोकप्रिय आयफोन मॉडिल भारतातील स्टोअर मधून हटवली आहेत. गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये नवीन आयफोन १६ मालिका लॉंच केल्यानंतर ॲपलने अनेक आयफोन मॉडेलना बाजारात हटविले होते. यात आयफोन १५ प्रो, आयफोन १५ प्रो मॅक्स आणि आयफोन १३ चा समावेश होता. आता या तीन फोनशिवाय आणखी तीन आयफोन भारतीय बाजारातून हद्दपार करणार आहेत.

**बंद झाले हे तीन मॉडेल्स**

आयफोन १६ ई २०२२ मध्ये लॉंच केलेल्या आयफोन एसई ३ चे अपग्रेड मॉडेल्स म्हटले जात आहे. हा लेटेस्ट आयफोन कंपनीने एसई मॉडेलच्या तुलनेत मोठ्या अपडेटने मिळतो. यात प्रथमच फेस आयडीचा वापर केला गेलेला आहे. हा आयफोन लेटेस्ट
१८
बीआयओएनआयसी चिप आणि इन हाऊस ५ जी मॉडेलसह बाजारात उपलब्ध आहे. ॲपल स्टोअरमधून २०२२ मध्ये लॉंच झालेल्या आयफोन एसई ३ हटविले आहे. हा आईफोन ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि अन्य रिटेल स्टोअरमध्ये केवळ स्टॉक संपेपर्यंतच मिळणार आहे.

२०२२ मध्ये लॉंच झालेला आयफोन १४ आणि आयफोन १४ प्लस देखील अधिकृतरित्या ॲपल स्टोअर मधून हटविले आहे. ॲपलच्या ऑनलाईन स्टोअरवर दोन्ही मॉडिल आता विक्रीसाठी उपलब्ध नाहीत. परंतु युजर तरीही त्यांना ॲमेझॉन, फ्लिपकार्ट किंवा अन्य रिटेल स्टोरमधून स्टॉक उपलब्ध असे पर्यंत घेऊ शकणार आहेत.

## यूजीसीचा निकाल कसा तपासणार?

यूजीसी नेट डिसेंबर २०२४ परीक्षेचा निकाल तपासण्यासाठी पुढील माहितीचा उपयोग होऊ शकेल. विशेष म्हणजे तुम्ही अगदी एका क्लिकवर यूजीसी नेट परीक्षेचा निकाल तपासू शकता. यासाठी फक्त पुढील प्रक्रिया जाणून घ्यावी लागेल.

नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) लवकरच यूजीसी नेट डिसेंबर २०२४ परीक्षेचा निकाल जाहीर करू शकते. यासोबतच अंतिम उत्तरही जाहीर केले जाऊ शकते. या परीक्षेला बसलेले उमेदवार यूजीसी नेट डिसेंबर २०२४ परीक्षेचा निकाल युजीसीएनईटी. एनटीए.एसी.आयएन या अधिकृत वेबसाइटवर जाऊन निकाल पाहू शकतात. 'एनटीए'ने अद्याप अधिकृतरित्या निकाल जाहीर करण्याची तारीख जाहीर केलेली नाही; परंतु सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लवकरच निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. याशिवाय उमेदवार थेट ही लिंक एचटीटीपीएस://यूजीसीएनईटी.एनटीए.एसी. आयएन/ तसेच अधिकृत वेबसाइटद्वारेदेखील आपला निकाल पाहू शकता. तसेच खाली दिलेल्या या स्टेप्सद्वारे निकाल पाहू शकता.


या वर्षी यूजीसी नेट परीक्षा तीन जानेवारी ते २७ जानेवारी २०२५ दरम्यान देशभरातील विविध परीक्षा केंद्रांवर नऊ वेगवेगळ्या दिवशी आयोजित करण्यात आली होती. यापूर्वी ३१ जानेवारी २०२५ रोजी तात्पुरते उत्तर जाहीर करण्यात आले होते. उमेदवारांना तीन फेब्रुवारी २०२५ पर्यंत उत्तरपत्रिकेवर हरकती नोंदविण्याची संधी देण्यात आली होती. तात्पुरत्या उत्तर तालिकाच्या आधारे निकाल तयार केला जाईल. 'यूजीसी नेट'चा निकाल जाहीर झाल्यापासून ९० दिवसांपर्यंत नोंदी जतन केल्या जातील. पुनर्मूल्यांकन प्रक्रिया उपलब्ध होणार नाही.

**'यूजीसी नेट'चा डिसेंबर निकाल २०२४ कसा तपासावा?**

युजीसीएनईटी.एनटीए.एसी.आयएन च्या अधिकृत वेबसाइटवर जा. युजीसी एनईटी डिसेंबर निकाल २०२४ लिहिलेल्या लिंकवर क्लिक करा. आवश्यक तपशील प्रविष्ट करा. निकाल स्क्रीनवर दिसेल.

**पीएच. डी. प्रवेश गुणवत्ता यादी कशी तयार होते?**

नेट परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या




जाणून घ्या

उमेदवारांच्या नेट पर्सेंटाइलला ७० टक्के तर मुलाखतीला ३० टक्के वेटेज देण्यात येणार आहे. कॅटेगरी २ आणि कॅटेगरी ३ या दोन्हीतील नेट स्कोअर केवळ एका वर्षासाठी वैध असेल.


**'यूजीसी नेट'चा परीक्षा का घेतली जाते?**

ज्युनिअर रिसर्च फेलोशिप, असिस्टंट प्रोफेसर आणि पीएचडी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) द्वारे 'यूजीसी नेट'ची परीक्षा घेतली जाते.

स्मार्ट आयडिआज

### टच न करता पाहता येतील रील्स

इन्स्टग्रामवर रील स्क्रोल करताना अनेकदा हात थकतात. त्याचमुळे आता रील स्पर्श न करता बदलत येतील का, असा प्रश्न पडला असेल तर त्या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. तुम्हाला आयफोन मध्ये एक छोटी सेटिंग करावी लागेल. यानंतर तुम्ही रीलांना स्पर्श न करता पाहू शकता. यासाठी फोनमधील सेटिंगमध्ये जा. येथे संपूर्ण सेटअप मिळेल. सेटअपसाठी खाली दिलेल्या प्रक्रियेचे अनुसरण करा. थोडेसे स्क्रोल केले तर तुम्हाला ॲक्सेसिबिलिटीचा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा.




ॲक्सेसिबिलिटी वर क्लिक केल्यानंतर सेटअप व्हॉईस कन्ट्रोल या पर्यायावर जा. येथे क्रिएट न्यू कमांड वर क्लिक करा. आता तुमच्या आवाजात नेक्स्ट म्हणा आणि रन कस्टम वर क्लिक करा. नवीन कमांडवर जा आणि इंस्टग्राम रील ज्या दिशेने ल होईल त्या दिशेने आपले बोट स्लाइड करा. यानंतर उजव्या कोपऱ्यात दिसणाऱ्या सेव्ह ऑप्शनवर क्लिक करा. आता एन्स्टग्राम वर जा आणि त्याला स्पर्श न करता नेक्स्ट म्हणत रील पहा.

## 'गूगल पे'चे एक खास फिचर

टेक्नो टॉक

'गूगल पे'ने आपल्या यूजर्ससाठी पेमेंट करताना वापरता येईल असे 'एआय फीचर्स' सुरू केले आहे. आता 'गूगल पे'वर फक्त बोलून म्हणजेच व्हॉइस कमांडवर यूपीआय पेमेंट करता येणार आहे. या नव्या 'व्हॉइस फीचर'द्वारे डिजिटल पेमेंट करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. या फीचर्सबद्दलची संपूर्ण माहिती देण्यात आलेली नाही. छोट्या-मोठ्या व्यवहारांसाठी 'यूपीआय'वर अवलंबून राहणाऱ्या सर्वांसाठी हे 'व्हॉइस कमांड अपडेट'चे फीचर महत्त्वाचे ठरणार आहे. 'गूगल पे'मध्ये व्हॉईस कमांडमुळे फार टेकसेव्ही नसणाऱ्या आणि तांत्रिकदृष्ट्या अशिक्षित असणाऱ्यांनाही ऑनलाइन पेमेंट करणे अधिक सोपे होणार आहे. कारण व्हॉस कमांडद्वारे व्यवहार हाताळता येणार आहेत. या फिचरला 'ट्रान्सफॉर्मेटिव्ह व्हॉईस' असे नाव देण्यात आले आहे. 'गूगल'ने स्थानिक भाषांमध्ये पेमेंट फॅसिलिटी सुलभ करण्याच्या उद्देशाने एआय प्रकल्पावर भारत सरकारबरोबर काम करत आहे. यासंदर्भातील करारही झाला आहे.




## फोनमधील फीचर करेल भूकंपाबाबत अॅलर्ट

गॅझेट वॉच

अलिकडेच दिल्लीमध्ये ४.० तीव्रतेचा भूकंप झाला. या पार्श्वभूमीवर भूकंप येण्यापूर्वी माहिती मिळाल्यास काय होईल? हे होऊ शकते आणि तेही तुमच्या अँड्रॉइड स्मार्टफोनद्वारे. मंडळी, अँड्रॉइडवरील एक फीचर भूकंपाच्या वेळी अलर्ट देते.

**भूकंप सूचना फीचर कसे वापरावे?**


फोनमध्ये भूकंपाचा इशारा मिळण्यासाठी एक फिचर इनेबल करावे लागेल. अर्थातच सूचना प्राप्त करण्यासाठी फोनमध्ये इंटरनेट कनेक्शन असणे आवश्यक आहे. याशिवाय भूकंपाचे इशारे देणारे ठिकाणही चालू करावे लागणार आहे.

**हे फीचर कसे सक्षम करावे?**

यासाठी प्रथम फोनमधील सेटिंग्ज उघडा. तेथे फोन सुरक्षा आणि आपत्कालीन स्थितीची माहिती देण्याच्या स्थितीत आणा. भूकंपाच्या सूचनांवर टॅप करा. भूकंपाचे अलर्ट चालू करणारा इशारा सुरू करा. येथे तुम्ही अलर्टचा डेमोदेखील तपासू शकता.

**कसे कार्य करते?**

अँड्रॉइडचे भूकंप अलर्ट वैशिष्ट्य अनेक गोष्टी करते. अँड्रॉइड फोनमध्ये एक्सीलरोमीटर आणि जायरोस्कोपसारखे सेन्सर असतात, जे जमिनीची कंपन मोजण्यात मदत करतात. भूकंपाचे हलके धक्के या सेन्सर्सद्वारे जाणवतात, तेव्हा स्मार्टफोन ती माहिती गुगल ए च्या सिस्टमला पाठवतो. क्लाउड-आधारित डेटा प्रोसेसिंग गुगल ची प्रणाली या डेटावर त्वरित प्रक्रिया करते आणि भूकंपाच्या आकाराचा आणि स्थानाचा अंदाज लावते. यानंतर यूजर्सना अलर्ट पाठवला जातो.





**स्मार्टफोन नेटवर्कचा वापर**

भूकंप आढळल्यानंतर, गुगल चे सेवा नेटवर्क वापरून अँड्रॉइड फोनद्वारे स्थानिक वापरकर्त्यांपर्यंत हा इशारा त्वरित पोहोचते. 'गूगल'च्या म्हणण्यानुसार भूकंपाचा इशारा देणारी यंत्रणा अतिशय अचूक आहे. हे लहान भूकंप देखील शोधू शकते; मात्र 'गूगल'च्या या फीचरवर अनेकवेळा प्रश्न उपस्थित झाले आहेत. भारतात हे फीचर अँड्रॉइड यूजर्ससाठी लाइव्ह आहे.

## रॉकींग लूक

फॅशन पॅशन



दोस्तांनो, काही वर्षांपूर्वीपर्यंत मुलांच्या वॉर्डरोबमध्ये एखादाच प्रिंटेड शर्ट असायचा. कॅज्युअल प्रसंगी तो कॅरी केला जायचा. पण आता फॅशनविश्व पूर्णपणे बदलून गेलं आहे. प्रिंटेड शर्ट मुख्य प्रवाहात आले आहेत. प्रिंट्समुळे सर्वसाधारण पेहरावालाही वेगळा लूक येतो. मात्र त्यावर योग्य बॉटम कॅरी करायला हवी. प्रिंटेड शर्टवर कोणती पँट घालायला हवी याबाबत...

* शर्टवरील प्रत्येक प्रिंट लक्षवेधी असायला हवी असं नाही. 'पेसली', 'गिंगम' किंवा 'पोलका डॉट्स' या प्रिंट्स तुम्हाला क्लासिक लूक मिळवून देतील. प्रिंटेड शर्टमुळे जीन्स आणि स्नीकर्समधल्या साध्या लूकलाही वेगळीच झळाळी येईल. पहिल्यांदाच प्रिंट्स घालणार असाल तर कलर कॉम्बिनेशनकडे लक्ष द्या. मिनिमल प्रिंटपासून सुरुवात करा. 'हवाईयन प्रिंट्स' फक्त फिरायला जाताना घालण्यापुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. हा प्रकार तुम्ही वर्षभर कॅरी करू शकता. मोठ्या ब्रँड्सनी ब्लॅक, फॉरेस्ट ग्रीन, मातकट अशा रंगांमध्ये हवाईयन प्रिंटेड शर्टस आणले आहेत. या रंगाचे शर्टस खूप ट्रेंडी दिसतात. हे शर्ट चिनोज किंवा जीन्सवर घालता येतील.

* 'फ्लोरल प्रिंट' हा प्रकारही चांगलाच हिट आहे. रग्ड डेनिम किंवा शॉर्टसवर फ्लोरल प्रिंटवाले शर्ट घालता येतील. गडद रंगाच्या सूटवरही ते शोभून दिसतील. ब्लॅक जीन्सवर फ्लोरल शर्ट घालणं सर्वात सोपी फॅशन आहे.


* 'ॲनिमल प्रिंट्स' मुळातच खूप भडक असतात. त्यामुळे बॉटम्स थोड्या सौम्य असाव्या. चिनोज, डेनिम्स किंवा ब्लेझरवर या प्रिंट्सचे शर्ट घाला.

## हिरव्या वाटेवर

भटकंती

कॉलेजच्या परीक्षा संपल्यावर भटकंतीला सुरुवात होते. या दिवसात बाईकवरून फिरायची संधी असते. भरपूर वेळ असल्याने निसर्गाचा आस्वाद घेत, वळणावळणाच्या रस्त्यावरून अगदी आरामात जाता येतं. बाईकवरून जायचं तर हटके ठिकाणं हवी. दुतर्फा झाडी असलेल्या रस्त्यावरून जाण्याची मजा वेगळीच. यासाठी फार लांब जायची गरज नाही. आपल्या महाराष्ट्रात अत्यंत सुंदर आणि रमणीय ठिकाणं आहेत. अशाच सुंदर ठिकाणांपैकी एक म्हणजे ताम्हिणी घाट. हा घाट पुण्याला कोकणाशी जोडतो. या घाटातून जाण्याची खरी मजा पावसाळ्यातच येत असली तरी उन्हाळ्यातही तुम्ही या भागाची सैर करू शकता.

ताम्हिणी ते मुळशीदरम्यानचा हा घाट निसर्गप्रेमींसाठी पर्वणी ठरतो. ताम्हिणीतलं थंड हवेचं ठिकाण खूप प्रसिद्ध आहे. वीकेंडसाठी तर हा घाट बेस्टच. या परिसरात बघण्यासारखं खूप काही आहे. तळी, घनदाट झाडी हे दृश्य मनोहारी दिसतं. मुळशी धरण पाहिल्याशिवाय इथला प्रवास पूर्णच होत नाही. इथे तुम्ही रिव्हर राफ्टिंगचा आनंद लुटू शकता. इथून जवळच कोलाड नावाचं ठिकाण आहे.



कुंडलिक नदीवर बांधण्यात आलेल्या पुलावरून इथे जाता येतं. वंजाई देवीचं मंदिरही पर्यटकांना आकर्षित करतं. इथे आल्यावर सिंहगडाला भेट द्यायला विसरू नका. ताम्हणी घाटाच्या बाईक टूर्सही असतात. इंटरनेटवर याची माहिती मिळू शकेल. मग काय दोस्तांनो, ताम्हिणी घाटाच्या मस्त सफरीला सज्ज व्हा.

# महापालिका शाळेच्या मैदानावरच तुटल्या वीज वाहिनीच्या 'हाय व्होल्टेज' च्या तारा

## सुदैवाने मोठा अनर्थ टळला, महावितरणच्या कार्यालयाकडे पत्रव्यवहार करुनही दखल नाही, पालक शिक्षकांनी केली तारा हटवण्याची मागणी

नगर – केडगाव अयोध्यानगर मनपाची लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शाळेच्या मैदाना वरती विद्युत विभागाची 'हाय व्होल्टेज' च्या तारा गेल्या असून सकाळी शाळा भरण्याच्या आधी तारा तुटून मैदानावरती पडल्या होत्या. शिक्षक शाळेत आले असता निदर्शनात आल्यानंतर विद्युत विभागाच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधला आणि कर्मचारी आल्यानंतर विद्युत पुरवठा बंद केला. जर शाळा सुरू असताना किंवा विद्यार्थी मैदानावर खेळत असताना 'हाय व्होल्टेजच्या' तारा पडल्या असत्या तर मोठा अनर्थ घडला असता. मात्र सुदैवाने कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही विद्युत विभागाने तारा तुटण्याच्या अगोदर उपायोजना करणे गरजेचे होते, आता तरी विद्युत विभागाच्या अधिकाऱ्याने तातडीने लक्ष घालून शाळेच्या आवारातील विद्युत तारा हटवाव्यात अशी मागणी पालक शिक्षकांनी केली.

शाळेच्या मैदानावरील 'हाय व्होल्टेजच्या' तारा हटवण्याची मागणी नगर व केडगाव विद्युत विभागाच्या कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला होता. मात्र त्यांनी दखल न घेता आम्हालाच उडवा उडवी ची उत्तरे दिली. ते म्हणाले होते की शाळा आधी कि विद्युत तारा, त्यांच्या हलगर्जी पणामुळे तारा तुटून शाळेच्या मैदानावरती पडल्या, आता तरी तारा हटवण्यात याव्यात अशी मागणी पालक व शिक्षकांनी केली.



विद्युत विभागाच्या 'हाय व्होल्टेज' च्या तुटलेल्या तारा छायाचित्रात दिसत आहेत. (छाया – लहू दळवी)

# महिला दिनानिमित्त 'प्रकाश नेत्रालया'त मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – जागतिक महिला दिनानिमित्त येथील प्रकाश नेत्रालयात मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महिलांच्या डोळ्यांची तपासणी करुण औषधोपचार करण्यात येणार आहेत. लेसीक उपचार पद्धतीवर खास सवलत तसेच चष्म्यावर तीस टक्के सवलत देण्यात येणार असल्याची माहिती डॉ.राजीव चिटगोपेकर यांनी दिली.



डॉ.राजीव चिटगोपेकर

नेत्रालयाच्या वतीने सामाजीक भावनेतून नेहमी विविध सामाजीक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. आतापर्यंत नेत्र शिबिराच्या माध्यमातून अनेक रुग्णांना त्याचा फायदा झाला आहे. जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित नेत्र शिबिरामध्ये महिला वर्गांनी आपल्या डोळ्यांची तपासणी करून घ्यावी असे आवाहन डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी केले आहे.

सकाळी दहा ते दुपारी दोन या वेळेत नगर मनमाड रोडवरील प्रकाश नेत्रालयात सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

# शहराच्या खासगी जागांतील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामांवर कारवाई होणार

## बांधकाम मनपाने पडल्यास जागामालक, विकासकाकडून दहा पट खर्च वसूल करणार; रहिवाश्यांसह जागामालक, विकासकांवरही गुन्हे दाखल होणार

नगर – खाजगी जागांमधील अनधिकृत बांधकामांवर कारवाईसाठी राज्य सरकारने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार अनधिकृत बांधकामांना नोटीस देताना जागा मालक, विकासक (बिल्डर) व ठेकेदार (बांधकाम करणारा कंत्राटदार) यांनाही नोटीसा बजावण्यात येणार आहेत. मुदतीत अनधिकृत बांधकामे न काढल्यास किंवा नियमित करून न घेतल्यास सदर बांधकामे तत्काळ कारवाई करून पाडण्यात येतील, तसेच शासनाच्या आदेशानुसार जागामालक व विकासकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली आहे.

शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६, महाराष्ट्र महानगरपालिका कायदा अंतर्गत अनधिकृत बांधकामाबाबत रहिवाश्यासह संबंधित जमिनमालक, विकासक, ठेकेदार यांनाही नोटीस देण्यात येणार आहे. संबंधित जमिनमालकाने अनधिकृत बांधकामाच्या वेळी किंवा त्याच्या सुरूवातीपासून सहा महिन्यांच्या आत कोणतीही अतिक्रमणाची किंवा अनधिकृत बांधकामाची तक्रार दाखल केली नसेल, असे अनधिकृत बांधकाम जमिनमालकांच्या संगनमताने किंवा सहभागाने झाल्याचे समजण्यात येईल आणि अशा जमिन मालकांवर अनधिकृत बांधकामाची जबाबदारी निश्चित करून कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

कायद्याच्या तरतुदींनुसार नियमितीकरण, सुधारणा किंवा पाडकाम करण्याची नोटीस देण्यात आल्यावर दिलेल्या कालावधीत सुधारणा किंवा नियमितीकरण केले नाही, तर कायद्यानुसार संबंधित जमिनमालक, विकासकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. त्यांना ठराविक कालावधीत स्वतःहून बांधकाम पाडण्यास सूचित केले जाईल. जर जमीन मालकांनी ठरवून दिलेल्या कालावधीत स्वतः बांधकाम तोडले नाही, तर महानगरपालिका पाडकाम करून शासनाने केलेल्या तरतुदीनुसार पाडकामाचा दहा पट खर्च जमीनमालकाकडून वसूल करणार आहे. पाडकाम खर्च जमिनमालकाने मागणीपत्राच्या सात दिवसात न भरल्यास त्यावर १८% चक्रवाढ व्याज आकारण्यात येणार आहे. ही रक्कम थकीत राहिल्यास कायद्यांतील कठोर तरतुदीनुसार वसुलीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल, असेही यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.

महानगरपालिकेकडून सातत्याने अनधिकृत बांधकामाचा शोध घेऊन त्वरित कारवाई सुरू केली जाणार आहे. वापरात नसलेली अनधिकृत बांधकामे तात्काळ कायदेशीर प्रक्रियेनुसार पाडण्यात येणार आहेत. जमिनमालक, ठेकेदार, वास्तुविशारद आणि विकासकाविरुद्ध फौजदारी कारवाई केली जाणार आहे. शहरातील खासगी जागांमध्ये विनापरवाना, बांधकामाची परवानगी न घेता, नियमबाह्य पद्धतीने करण्यात आलेल्या बांधकामांवर कारवाई सुरू करण्यात येत असून, अनधिकृत बांधकाम धारकांनी जी बांधकामे नियमानुसार अधिकृत, नियमित करता येत असतील, तर ती नियमित करून घ्यावीत. जी नियमित होऊ शकत नाहीत, ती काढून घ्यावीत, अन्यथा मनपा कारवाई करेल, असा इशाराही यशवंत डांगे यांनी दिला आहे.

# 'अहमदनगर'ऐवजी 'अहिल्यानगर' नामकरणासाठी बँकेसमोर निदर्शने



एच.डी.एफ.सी बँकेने तातडीने फलकावरती अहिल्यानगरचे नामकरण करावेच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बँकेसमोर आंदोलन करत प्रशासनाला इशारा दिला. (छाया – लहू दळवी)

नगर – केंद्र व राज्य सरकारने अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर असे केले असताना देखील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील एच.डी.एफ.सी बँकेने अजून पर्यंत फलकावरती अहमदनगर असाच उल्लेख असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वतीने बँकेसमोर आंदोलन करत प्रशासनाला तातडीने नाव बदलून अहिल्यानगर करण्याच्या सूचना दिल्या असून, जेवढा वेळ नाव बदलायला लागेल तेवढ्या वेळातच अहिल्यानगर करावे अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल. असा इशारा देताच प्रशासनाने नाव बदलण्याचे हालचाली सुरु केल्या. तसेच नगर शहरातील ज्या दुकानदाराने अजून पर्यंत अहिल्यानगर हे नाव टाकले नसेल त्यांनी तातडीने फलक बदलून घ्यावे अन्यथा तोडफोड आंदोलन केले जाईल, असा इशारा शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी दिला

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील एच.डी.एफ.सी बँकेच्या फलकावरती अहमदनगर असाचं उल्लेख असल्यामुळे निदर्शने करताना संपत बारस्कर, गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, महिला जिल्हाध्यक्ष आशाताई निंबाळकर, कार्याध्यक्ष अभिजीत खोसे, सुरेश बनसोडे, मंगेश खताळ, युवराज शिंदे, सागर गुंजाळ, केतन क्षीरसागर, संतोष ढाकणे, वैभव ढाकणे, लताताई पवार, रेणुका पुंड, अंजली आव्हाड, सुरज शिंदे, सागर पंधाडे, सोनू घेमुंड, दिनेश जोशी, राजेश भालेराव आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

बँकेसमोर आंदोलन सुरू असताना प्रशासनाने तातडीने फलकावरील नाव बदलून अहिल्यानगर केले जाईल असे सांगितल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

## आहिल शेख याचा रमजानचा पहिला रोजा

नगर – काटवन खंडोबा रोड, गाझी नगर येथील आहिल वाजिद शेख याने रमजानचा पहिला रोजा (उपवास) केला. वयाच्या ८ व्या वर्षी त्याने रमजानच्या पवित्र महिन्यात अन्न, पाणी विना उपवास केला आहे.



पहाटे त्याने सहेरी करुन भक्तीभावाने नमाज अदा केली आणि संध्याकाळी रोजा इफ्तारीने सोडला. तब्बल तेरा तासांहून अधिक काळ त्याने निर्जली रोजा ठेवला होता. आहिल हा ज्येष्ठ वृत्त छायाचित्रकार राजू शेख यांचा नातू व वृत्त छायाचित्रकार वाजिद शेख आणि मुकुंदनगरमधील जाकिर हुसेन प्राथमिक शाळेच्या शिक्षिका हिना शेख यांचा चिरंजीव आहे. तो इयत्ता दुसरीमध्ये अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिक्षण घेत आहे.

# तरुणाचा खून करणाऱ्या टोळीने आणखी एकाला खंडणीसाठी डांबले

## ८ जणांच्या विरुद्ध दुसरा गुन्हा दाखल

नगर – तपोवन रोड वरून वैभव शिवाजी नायकोडी (वय १९, रा. ढवणवस्ती, तपोवन रस्ता) याचे अपहरण करून त्याचा खुन करणाऱ्या आरोपींनी आणखी एका १९ वर्षीय युवकाचे अपहरण करत खंडणीसाठी त्यास मारहाण करून प्लॉटवर डांबून ठेवले व त्याच्या सुटकेसाठी त्याच्या आई वडिलांकडे ५० हजार रुपयाची मागणी केल्याची घटना दि. २१ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी दरम्यान नवनागापूर, चेतना कॉलनी, सम्राटनगर आणि गोल्डन सिटी जवळील आठरे पाटील शाळेजवळ घडली.

याबाबत भागाजी वाळुंज (वय १९, रा. सम्राटनगर, चेतना कॉलनी, नवनागापूर, एमआयडीसी) याने एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे की अनिकेत उर्फ लपका सोमवंशी, नितीन नन्नवरे, महेश पाटील, करण सुंदर शिंदे, विशाल कापरे, रोहित गोसावी, सोनू घोडके (सर्व राहणार अ.नगर) यांनी भागाजी वाळुंज याच्या आई-वडिलांना धमकावून भागाजी यास घरुन घेऊन गेले आणि त्याला लपकाच्या गरवारे चौक येथील टपरीजवळ मारहाण केली तसेच त्यांनी त्यास आठरे पाटील शाळेच्या मागे, गोल्डन सिटी जवळ नेऊन लाठ्या काठ्या, प्लास्टिकचे पाईप, बेल्ट व लाथा बुक्क्यांनी जबर मारहाण केली.

त्यांनी भागाजी यास रात्रभर वेगवेगळ्या पद्धतीने मारहाण केली. गोल्डन सिटी येथील रोडच्या कडेला असलेल्या सिमेंटच्या चेंबरमध्ये घालून तसेच त्याचे सर्व कपडे काढून त्यास नग्न करून मारहाण करून त्रास दिला. त्यानंतर चेतना कॉलनीतील एका प्लॉटवर नेऊन डांबून ठेवले. त्याला जिवंत सोडण्यासाठी घरून ५० हजार रुपये आण अशी मागणी केली. तसेच २२ फेब्रुवारी रोजी रात्री ९.३० ते २३ फेब्रुवारी रोजीच्या पहाटे २.३० वाजण्याच्या सुमारास त्याला पुन्हा सर्वांनी मारहाण केली.

त्यावेळी झालेल्या मारहाणीत वैभव नायकोडी याचा खून केल्याचे कोणास सांगू नये म्हणून त्यास चेतना कॉलनी येथील प्लॉटवर दोन दिवस डांबून ठेवले. असे भागाजी वाळुंज याने फिर्यादीत म्हंटले आहे.या फिर्यादी वरून एमआयडीसी पोलिसांनी अनिकेत उर्फ लपका सोमवंशी, नितीन नन्नवरे, महेश पाटील, करण सुंदर शिंदे, विशाल कापरे, रोहित गोसावी, सोनू घोडके यांच्याविरुद्ध भा न्या सं ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), १९१ (२) (३), १९०, १४० (३), १२७ (२), ३०८ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक मोढे हे करीत आहेत.

# आरक्षणाची तरतूद डावलून नोकर भरती करणाऱ्या जिल्हा बँक विरोधात बेमुदत धरणे आंदोलन; निदर्शने

नगर – आरक्षणाची तरतूद डावलून अहिल्यानगर मध्यवर्ती जिल्हा सहकारी बँकेत होत असलेल्या भरतीला विरोध दर्शविण्यासाठी ३ मार्च पासून जिल्हा बँकेसमोर वंचित बहुजन आघाडीच्यावतीने बेमुदत धरणे आंदोलनास प्रारंभ करण्यात आला. आंदोलकांनी निदर्शने करुन, बँकेत आरक्षण डावलून होत असलेल्या भरतीच्या निषेधार्थ बोंबा मारल्या. या आंदोलनात आघाडीचे केंद्रीय सदस्य तथा प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, राज्य प्रवक्ते ॲड. अरुण जाधव, राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते यांच्या प्रमुख उपस्थितीत, जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या अध्यक्षतेखाली, अनिल जाधव, संतोष चोळके, शहराध्यक्ष हनीफ शेख, प्यारेलाल शेख, सुधीर ठोंबे, देविदास भालेराव, प्रसाद भिवसने, मारुती पाटोळे, पोपट शेटे, युवा जिल्हाध्यक्ष सोमनाथ भैलुमे, संजय शेलार, महेश पवार, पोपट सरोदे, ॲड. योगेश गुंजाळ, राजीव भिंगारदिवे, लता भांड, अनिता जगधने, पी. के. गवारे, साळवे मॅडम, विठ्ठल माळी, विलास माळी, चंद्रकांत नेटके, प्रवीण ओरे, किरण पाटोळे आदींसह जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.



आरक्षणाची तरतूद डावलून नोकर भरती करणाऱ्या जिल्हा बँक विरोधात वंचित बहुजन आघाडीच्यावतीने बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले.

जिल्हा सहकारी बँकेच्या जाहीर झालेल्या भरतीमध्ये विविध समाज घटकांच्या आरक्षणाची तरतूदीची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. सरळ भरतीने संविधानाच्या कलम ३४०, ३४१, ३४२ कडे दुर्लक्ष करून सामाजिक न्याय तत्त्वाचा भंग केला जात आहे. सदर भरती बेकायदेशीरपणे संविधानाचे उल्लंघन करून होत असून, समाजातील वंचित घटकावर अन्यायकारक असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

जिल्हा बँक हा शासनाचा उपक्रम आहे. त्यामुळे बँकेला अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग यांच्याकरिता त्यांच्या सेवकांमध्ये ५२ टक्के जागा राखीव ठेवणे बंधनकारक आहे.जिल्हा बँकेचे सेवक भरतीचे जे नियम सहकार खात्याकडून मंजूर करून घेतलेले आहेत, त्यात राखीव जागेची तरतूद आहे. या नियमांमध्ये कोणताही बदल झालेला नसताना जिल्हा बँक यांनी आरक्षणाशिवाय नोकर भरती करण्याचा घाट घातला असल्याचे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने स्पष्ट करण्यात आला आहे.

जिल्हा सहकारी बँकेच्या नव्याने जाहीर केलेल्या भरतीमध्ये आरक्षणाची तरतूद रद्द करण्यात आलेली असून, बँकेकडे पाठपुरावा करून देखील कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. बँक प्रशासनकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करून देखील कुठलाही खुलासा आणि कुठलीही चर्चा न केल्याने आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आल्याचे म्हंटले आहे.

आंदोलन स्थळी जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन सिताराम गायकर व संचालक माधवराव कानवडे यांनी आंदोलकांशी चर्चा करुन चेअरमन शिवाजी कर्डिले यांच्या निवासस्थानी यासंदर्भात चर्चेचे आमंत्रण दिले. मात्र आंदोलकांनी त्यांचे आमंत्रण नाकारुन आंदोलन सुरु ठेवले. तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे आणि सहाय्यक निबंधक गणेश औटी यांनी आंदोलकांशी चर्चा केली. मात्र आरक्षणाच्या तरतुदीप्रमाणे जिल्हा सहकारी बँकेत भरती प्रक्रिया राबविण्याचे ठोस आश्वासन मिळत नाही, तो पर्यंत आंदोलन सुरु ठेवण्याचा पवित्रा आंदोलकांनी घेतला आहे. वंचित बहुजन आघाडीचे बेमुदत धरणे चालू राहणार असून, प्रत्येक तालुक्यातील पदाधिकारी यामध्ये सहभागी होणार आहेत.

# विविध मागण्यांसाठी पद्मशाली समाजाच्या उपोषणाला अहिल्यानगरमधून जाहीर पाठिंबा

नगर – पद्मशाली समाजाचे विशेष मागास प्रवर्गाच्या व विणकरांच्या विविध मागण्या व समस्या सोडविण्याबाबतचे निवेदन पद्मशाली समाजबांधवांच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना देण्यात आले. यावेळी पद्मशाली समाजातील कार्यकर्ते श्रीनिवास बोज्ञा, गणेश विद्ये, अमित बुरा, रवि दंडी, ज्ञानेश्वर मंगलारप, तिरमलेश पासकंटी, ॲड. राजू गाली, विनोद बोगा, पुरषोत्तम बुरा, प्रणित अनमल, श्रीनिवास बुरगुल, अमित बिल्ला, रितेश अनमल आदी उपस्थित होते.



पद्मशाली समाजाचे विशेष मागास प्रवर्गाच्या व विणकरांच्या विविध मागण्या व समस्या सोडविण्याबाबतचे निवेदन पद्मशाली समाज बांधवांच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना देण्यात आले.

विशेष मागास प्रवर्गाचा सदर निवेदन महाराष्ट्रातील पद्मशाली समाज बांधव ५ मार्चपासून पुणे येथील समाज कल्याण विभाग समोर, जिल्हाधिकारी कार्यालय जवळ, पुणे येथे साखळी उपोषण व धरणे आंदोलन करीत असून त्यास अहिल्यानगर येथील पद्मशाली समाजाचा जाहीर पाठिंबा देण्याकरीता निवेदन दिले असून पद्मशाली समाजाचे वतीने समाजातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय, अभियांत्रीकी व इतर उच्च शिक्षणात विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के स्वतंत्र आरक्षण २०२५ च्या सत्रापासुन लागु करावे, विशेष मागास प्रवर्गासाठी राज्यात १० आश्रमशाळा सुरू करणे, विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के राजकीय आरक्षण लागु करावे तसेच विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र त्वरीत देण्यात यावे, विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना राज्य शासनांच्या योजनासाठी एस.बी.सी. व केंद्र शासनाच्या योजनांसाठी ओ.बी.सी. प्रमाण देण्यात यावे, विशेष मागास प्रवर्गासाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ व विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरू करावे, एस.बी.सी. कर्मचाऱ्यांना शासकीय व निमशासकीय सेवेत पदोन्नती देण्यात यावी, विणकरांचे प्रश्न सोडविण्यासाठी विणकर आर्थिक महामंडळावर विणकरांची नियुक्ती करून त्वरीत काम सुरू करावे. या सर्व मागण्यांसाठी निवेदन दिले आहे. वरीलप्रमाणे मागण्या मान्य न झाल्यास व समस्या न सुटल्यास अहिल्यानगर येथील पद्मशाली समाजबांधवांना आमरण उपोषण करणे भाग पडेल, असा इशारा पद्मशाली समाजातील समाज बांधवांच्यावतीने देण्यात आले.

# धनादेश न वटल्याने पतसंस्थेच्या कर्जदारास न्यायालयाने सुनावली दंड व शिक्षा

नगर – श्रीलक्ष्मी महिला पतसंस्था, दिल्लीगेट, अ.नगर यांच्याकडून सौ. मीरा दिलीप निमसे, रा. गणेश चौक, बोल्हेगाव फाटा, अहिल्यानगर यांनी सुलभ कर्ज रु. २०,००० मात्र १३-१-२०१२ रोजी कर्ज घेतले होते. या संदर्भात कर्ज भरणेबाबत वारंवार वैयक्तिक व नोटीसीद्वारे मागणी केली. कर्जदारांनी २८-१२-२०१८ रोजी बँक ऑफ महाराष्ट्र, चितळेरोड, शाखा, नगर येथील चेक क्र. ७०९३४६ रु.४२८१३ रकमेचा चेक दिला असता संस्थेने तो चेक वटविण्यास बँकेत दिला. सदर चेक न वटता परत आला.

याबाबत संस्थेने वकीलामार्फत नोटीस देऊन सदर रक्कम भरणेबाबत कळविले असता रक्कम न भरल्यामुळे पतसंस्थेने कर्जदार सौ. मीरा दिलीप निमसे यांच्या विरुद्ध नि.इ. ॲक्ट १३८ अन्वये न्यायालयात दावा दाखल केला. सदर दाव्याचा निकाल १७-२-२०२५ रोजी संस्थेच्या बाजूने लागला असून न्यायालयाने कर्जदाराला दोषी धरुन रु.६५,००० रकमेचा दंड आणि ८ दिवसाची साध्या कैदेची शिक्षा सुनावली आहे. या दाव्यामध्ये पतसंस्थेच्या वतीने वकील म्हणून ॲड. राजू गाली यांनी काम पाहिले. तर पतसंस्थेतर्फे माहितगार इसम म्हणून सुहास त्रिंबक मोहोरकर यांनी बाजू मांडली. सदर निकाल असि. चीफ ज्युडि. मॅजिस्ट्रेट आय. एम. नाईकवाडी यांनी दिला.

